इ·सत. ९१२४
ग्रं. सं. ठाणें
निबंध
८२९
REFBK-0002460
REFBK-0002460

...अरण्या भारतीत लोकस्थितीं

ग्रं. सं. ठाणे
निबंध
८२१.

८१

REFBK-0002460

## हिंदु युनि...

# हेमंतोत्सव व्याख्यानमाला.

( रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी. एम्. ए. यांनीं दिलेलें व्याख्यान ).

# रामायण-कालीन-लोकस्थिति.

वाल्मीकिरामायण हें आदिकाव्य होय. आदिकाव्य असें नांव पडण्याचें कारण व या काव्याच्या रचनेचा इतिहास, यांबद्दल रामायणांत अशी कथा आहेः- 2460

## कथा.

वाल्मीकि ऋषींनीं नारदास प्रश्न केला कीं, हल्लींच्या काळीं कोणता राजा सर्व गुणांनीं मंडित, धर्मज्ञ, सत्यवाक्य, चारित्रयुक्त, प्रतापवान् आहे तो मला सांग. तेव्हां नारदानें रामाचें नांव घेऊन त्याचें चरित्र रावणवधानंतर तो अयोध्येस परत आला येथपर्यंत सांगून, रामाचें पुढचें चरित्र असें असें होईल ह्मणून ह्मटलें. पुढें नारद स्वर्गास गेल्यावर वाल्मीकि तमसा नदीवर स्नानास गेले. तेथें क्रौंच पक्ष्यांचें जोडपें काममोहित असतां, व्याधानें त्यांपैकीं एकाचा बाणानें वध केला. हें पाहून वाल्मीकींची कारुण्यवृत्ति उचंबळून त्यांच्या मुखांतून छंदोबद्ध वाणी अशी निघाली:-

**मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः**
**यत्क्रौंचमिथुनादेकमवधीः काममोहितम्॥**

याला चार पाद असून हा तन्त्रीवर तालसुरावर गातां येईल, असा हा शोकार्ताच्या तोंडून निघाला तेव्हां हा श्लोक होवो, असें ऋषि ह्मणाले. मग स्नान करून कलश हातीं घेऊन उटजांत परत आल्यावर ध्यानस्थ बसले, व शोकाकुल होत्साते तोच श्लोक गाऊं लागले. तेव्हां ब्रह्मदेव त्यांच्या दर्शनास आले. विहित आदरसत्कार झाल्यावर मुनि पुनः ध्यानस्थ होऊन तो श्लोक पुनः गाऊं लागले. तेव्हां ब्रह्मदेव हासून ह्मणाले "मुनिवर्या! माझ्याच प्रेरणेनें ही वाणी तुझ्या मुखांतून निघाली. हा श्लोक होईल.आतां तूं नारदानें तुला सांगितलें त्याप्रमाणें रामचरित्र श्लोकवृत्तांत गा. माझ्या प्रसादानें तुला सर्व गोष्टी, उघड घडल्या असतील त्या व एकांतांत घडल्या असतील त्या, कळून येतील. तुझी वाणी खोटी होणार नाहीं. तूं श्लोकबद्ध रचलेली रामकथा या पृथ्वीवरील पर्वत व नद्या राहतील तोंपर्यंत राहील, व तूंही तोंपर्यंत माझ्या लोकांत राहशील"—असा वर देऊन ब्रह्मदेव अंतर्धान पावले.

मग पवित्र कुशासनावर बसून मुनींनीं ध्यान करून तोंपर्यंत झालेलें रामचरित्र पाहिलें, व त्याप्रमाणें रचिलें. त्याचे एकंदर २४००० श्लोक, पांचशें सर्ग, सहा कांडें, व उत्तरचरित्र धरून सांत कांडें झालीं. पुढें मुनीला काळजी पडली कीं या चरित्राचा "प्रयोग" कोण करून दाखवील?—ह्मणजे कोण हें चरित्र ताल सुरावर याचे दोन अर्थ गाईल?—तेव्हां कुशीलव (१ कुश आणि लव; २ पात्रें) प्रयोग करण्याला पुढें झाले. त्यांची योग्यता पाहून वेदांचें उपबृंहण करणारें व सर्व रसांनीं ओथंबलेलें हें चरित्र गंधर्वांप्रमाणें गाणाऱ्या रामप्रतिबिंब

शिशूंच्या करवीं पाठ करवून ऋषिमंडळांत तालसुरावर गावविलें. तेव्हां सर्व मुनि विस्मित होऊन त्या गायकांस आपणांजवळ असलेले चीवर, कमंडलु, बसायची हात्री, दंड वगैरे पदार्थ देऊन तोषविते झाले. ज्यांजवळ देण्याला कांहीं नव्हतें त्यांनीं आयुरारोग्याभिवृद्धिरूप आशीर्वाद दिले. असें हें चरित्र पुढील कवींस आधारभूत झालेलें कुशलव अयोध्येच्या रथ्येंमध्यें गात असतां रामचंद्रानें ऐकिलें. तेव्हां राजवाड्यांत नेऊन त्यांचा योग्य सत्कार करून सर्व भ्राते व सचिव जवळ बसले असतां रामचंद्रानें त्यांजकडून हें चरित्र गावविलें.

सातव्या कांडांत हें चरित्र हयमेधाच्या वेळीं यज्ञवाटांत ऋषिमंडळ जमलें असतां गाइलें असें ह्मटलें आहे.

आधुनिक दृष्टीनें या कथेचें निरीक्षण केलें व रामायणांतील इतर भागांशीं इला जुळवून पाहिलें तर

## या कथेचा निष्कर्ष

निघतो तो असा. वाल्मीकि कवि रामाचे परमस्नेही होते. लक्ष्मण त्यांना दशरथाप्रमाणें लेखी [ ७,४७,१६-१७ ]. यांच्या आश्रमाजवळ चित्रकूट पर्वतावर राम, लक्ष्मण आणि सीता यांसह, चार महिने राहिला होता. राज्यप्राप्ति झाल्यानंतर लोकापवादास भिऊन रामानें सीतेचा त्याग केला त्यावेळीं, इला वाल्मीकीच्या आश्रमाजवळ नेऊन सोड अशी लक्ष्मणास आज्ञा केली. निर्जन वनांत टाक असें म्हटलें नाहीं. लक्ष्मणानें सीतेला तेथें नेलें तेव्हां हा वाल्मीकीचा आश्रम जवळ आहे, यांच्या पादच्छायेखालीं तूं स्वस्थ ऐस, तूं पतिव्रता आहेस, तुझें श्रेय होईल, असें त्यानें ह्मटलें आहे. या आश्रमांतच सीता प्रसूत होऊन तिला दोन अपत्यें झालीं. त्या रात्रीं शत्रुघ्न मधुपुरावर जाऊन लवणाचा वध करण्याकरितां चालला असतां

या आश्रमांतच होता. ( ७,६५,६६ ) लवणाला मारून मधुपुराची पुनः स्थापना करून शत्रुघ्न बारा वर्षांनीं अयोध्येस रामपाददर्शनार्थ जात असतां पुनः वाल्मीकीच्या आश्रमांत उतरला होता. तेथें त्यानें व त्याच्या सैन्यानें कुशलवांस रामचरित्र गातांना ऐकिलें व सर्व तटस्थ झाले.

सीता बारा वर्षें वाल्मीकीजवळ राहिली होती, तेव्हां रामचारित्राचे बरेच भाग तिच्याकडून वाल्मीकीला कळले असले पाहिजेत. तशांत—

## वाल्मीकि

तत्कालीन ऋषीं प्रमाणें बरींच तीर्थें हिंडला असला पाहिजे, व ऋषि मंडळांत बसून त्यानें अपराह्णीं कथाही ऐकिल्या असल्या पाहिजेत. या योगानें त्यांची मूळची स्वयंप्रतिमा उद्दीपित झाली असेल, व तशांत सीतेसारखी पतिव्रता नित्य डोळ्यांसमोर वागतांना पाहून करुणेनें तीव्र झाली असेल हें सांगावयाला नको. वाल्मीकीला सर्व सृष्टि करतलामलवत् दिसत असे. त्याचीं वर्णनें फारच साधीं व मनोहर आहेत. त्यांत रामचरित्रासारखें वीरकरुणरसांनीं परिप्लुत चरित्र मिळालें, तेव्हां त्याचें काव्य पुढील कवींना आधार झालें, व तें सरस्वतीच्या मुखांतून ऐकून ब्रह्मदेवानेंही मान डोलविली ( ७,१११,११ ) हें युक्तच झालें.

आधुनिक टीकेच्या कसोटीस हें काव्य लाविलें तर यांत पदोपदीं अतिशयोक्ति व असंभावना हे दोष दिसतील. पण कोणीही कवि असो व त्याची प्रतिभा कितीही उज्वल असो, समकालीन लोकांच्या समजुतींच्या पलीकडे त्याला फारसें जातां येत नाहीं, हें तत्त्व जर आपण लक्षांत ठेविलें तर, एकुणिसाव्या शतकांतील रसायनशास्त्र, विद्युच्छास्त्र इ.

शास्त्रांच्या अध्ययनानें ज्यांची सत्यान्वेषणबुद्धि तीव्र झाली आहे, ज्यांचा सत्यान्वेषणाचा पंथ असिधारेप्रमाणें कठीण झाला आहे, त्यांनीं हें चरित्र शास्त्राच्या कसोटीस उतरत नाहीं, असें ह्मटलें, तरी आपण फारशी पर्वा करूं नये. शास्त्र ह्मणून या चरित्राचें अध्ययन करूं नये. तसें केलें असतां आपण घोटाळ्यांत पडूं. हें चरित्र—

**काव्य आहे,**

असें घेऊन चालूं या. असंभावनेचा, अतिशयोक्तीचा भाग आपण गाळूं या. वाल्मीकि रामाचा परमसखा होता ह्मणून रामाचे गुण वर्णितांना, त्याच्या राज्याची स्थिति सांगतांना, त्यानें स्तुतीची झांक अधिक टाकली असेल, तसेंच रावणादि-कांचें वर्णन करितांना कृष्णवर्ण जास्त टाकला असेल, व शत्रूच्या वैभवाची महती जास्त केल्यानें त्याला ज्यानें धुळीस मिळविलें, त्याचा पराक्रम आपोआप वर्णिला जातो, या न्यायानें रावणादिकांच्या ऐश्वर्याची थोरवीही वाढविली असेल, हें घेऊन चाललों तरी हरकत नाहीं.

तर मग या काव्यापासून आपणांस कांहींच लाभ मिळणार नाहीं अशी जर आपण कल्पना कराल तर ती चुकीची होईल.

कोर्टामध्यें एखाद्या पक्षाकडील साक्षीदार लांब राहत असला ह्मणजे कोर्ट त्याची साक्ष त्या ठिकाणीं कमिशन बसवून घेतें, व त्या जबानीवरून अनुमान काढतें, त्याप्रमाणें येथें आपण केलें पाहिजे. अनुकूल भाग साशंक दृष्टीनें पाहिला पाहिजे, व प्रतिकूल भाग जमेस धरिला पाहिजे. जो भाग कथेच्या ओघानें सहजगत्या सांगितला असेल, व ज्यांत रागद्वेषादिकांला स्थान असण्याचा संभव कमी असेल

अथवा मुळींच नसेल, तोही भाग जमेस धरितां येईल. तसेंच उदाहरणद्वारा, व उपमाद्वारा, बरीच माहिती मिळण्याचा संभव आहे.

अनुकूल भाग सारांक दृष्टीनें पाहावा, असें वर ह्मटलें आहे, त्याची फोड करणें जरूर आहे. या ह्मणण्याचा अर्थ असा नाहीं कीं हा सर्व भाग त्याज्य आहे. त्यांतील ग्राह्यांश घेतला पाहिजे. तसेंच त्यावरून उत्तम पुरुषाविषयीं, साध्वी स्त्रीविषयीं, किंवा उत्तम राज्यव्यवस्थेविषयीं वगैरे त्या वेळच्या विचारी लोकाग्रणींच्या कल्पना (ideals) कशा होत्या, हें सहज समजतें. वस्तुस्थिति कल्पनेशीं सर्वांशीं जळत नाहीं, तरी ती कल्पनेच्या मागोमाग धावत असते. आणि कल्पना जर उदात्त असेल, तर वस्तुस्थिति कधींकाळीं तरी तिच्या जवळ जवळ येईल, अशी आशा असते. मि. जॉन मॉर्ले यांनीं आपल्या ग्रंथांत एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे:—

"The decisive sign of the elevation of a nation's life is to be sought among those who lead or ought to lead. The test of the health of a people is to be found in the utterance of those who are its spokesmen, and in the action of those whom it accepts or chooses to be its chiefs. We have to look to the magnitude of the issues and the height of the interests which engage its foremost spirits. What are the best men in a country striving for? And is the struggle pursued intrepidly, and with a sense of its size and amplitude, or with creeping foot and blinking eye? The answer to these questions is the answer to the other question, whether the best men in the country are small or great."

कवि हे लोकाग्रणींत श्रेष्ठ असतात; व त्यांच्या कल्पना शतकानुशतकें लोकांस मार्ग दाखवीत असतात. वाल्मीकींच्या कल्पना आज तीन साडे तीन हजार वर्षांवर या आर्यभूमींतील स्त्रीपुरुषांना, राजारंकांना, मार्ग दाखवित आहेत. समाजाचें व्यवस्थितरूप जें आज दिसत आहे, व परकल्पनांना व विचारांना टक्कर देण्याचा जो त्यांत जोम आहे, तें स्वरूप व तो जोम, वाल्मीकीसारख्यांच्या बऱ्याच कल्पनांचा परिणाम होत. त्या कल्पना कायमच्या ठशांनीं छापल्यामुळें त्यांना कमी जास्त प्रमाणानें रूढीचें स्वरूप आलें आहे व तींत फारसा फरक होत नाहीं. रामायण काव्य, तसेंच महाभारत, हे दोन ग्रंथ, किंवा त्यांना आधार धरून रचलेलीं आधुनिक प्राकृत भाषांत रचलेलीं काव्यें, नाटकें वगैरे जोंपर्यंत आबालवृद्धांच्या वाचण्यांत अगर ऐकण्यांत, अगर पाहण्यांत येत आहेत, तोंपर्यंत रूढीचा प्रभाव बराच कायम राहिला पाहिजे, अशी या दोन ग्रंथांची महती आहे. आतां या काव्यांतील कांहीं कल्पना वस्तुस्थितीस जुळत नसल्या तरी त्या जर उदात्त असतील व रुढि त्यांशीं विसंगत असेल, तर हल्लींच्या लोकनायकांनीं या पुरातन कल्पना लोकांच्या आदराला व सेवेला पात्र होतील असे प्रयत्न केले पाहिजेत. तशा कल्पनाही या काव्यांत आहेत. असो.

या काव्याचें अध्ययन केल्यानें कोणती माहिती मिळते हें सांगण्यापूर्वीं या काव्याच्या स्वरूपांत थोडा फरक झाला आहे त्याबद्दल सांगितलें पाहिजे.

## रामायणाच्या स्वरूपांत फरक.

मूळचें रामायण फार लहान होतें, व तें कथांनीं वगैरे पुढें वाढविलें असा तर्क पाश्चात्य विद्वानांनीं केला आहे. हा

खरा असला तरी मूळचें रूप शोधून काढणें आंजला बरेंच दूरापास्त झालें आहे. हल्लींचें रामायणाचें जें स्वरूप आहे, तें मनूच्या नंतर आणि बुद्धाच्या पूर्वी त्यास प्राप्त झालें आहे, इतकें निश्चयानें सांगतां येतें. तेव्हां हल्लीं उपलब्ध असलेल्या रामायणावरून अगदीं प्रथम रामायण झालें त्या काळची माहिती अगर त्या काळच्या समजुती कळल्या नाहींत तरी वर सांगितलेल्या या दोन गोष्टींमधल्या काळाच्या संबंधानें आपणाला बरीच माहिती मिळेल. हल्लीं उपलब्ध असलेल्या प्रतीस सुधारून वाढविलेली प्रत असें ह्मटलें तरी चालेल.

पण रामायणाची या काळांत ही वाढविलेली आवृत्ति कायम राहिली नाहीं. त्यानंतर मधून मधून प्रक्षिप्त सर्ग कोणीं तरी घुसडून दिले आहेत. प्रक्षिप्त श्लोक किती असतील तें सांगणें कठीण आहे. वाढविलेल्या आवृत्तींत सर्ग ५०० होते असें ह्मटलें आहे, पण हल्लींच्या मुंबईंत छापलेल्या आवृत्तींत ६४५ आहेत. कितीएकांच्या मतें उत्तरकांडांतील सर्ग यांत जमेस धरूं नये असें आहे. त्यांतील १११ सर्ग कमी केले, तरी बाकी ५०० वर राहते.

कतक ह्मणून एक रामायणावर टीकाकार होऊन गेला, त्यानें याविषयीं बराच विचार केला आहे, असें रामीय टीकेंत ह्मटलें आहे. तो व तीर्थ यांच्या टीका मीं पाहिल्या नाहींत. प्रकृत मुंबईच्या आवृत्तींत दहावीस तरी सर्ग टीकाकारांच्या पाहण्यांत आलेले नाहींत, असे " प्रक्षिप्त " ह्मणून छापले आहेत. असे " प्रक्षिप्त " सर्ग कसे येतात, याविषयीं थोडा विचार केला पाहिजे.

कोठें मुख्य कथेंत कांहीं भाग अविस्तृत आहे किंवा कांहीं गोष्ट घडली असें अनुमान निघत असून ती घडल्या-बद्दल वर्णन नाहीं, तर तो भाग वाल्मीकीचा वेष घेतले-ल्यांनीं वाढविला आहे, किंवा नवीन जोडून घातला आहे. उदाहरणार्थ काकधर्षणाचा सर्ग किंवा इंद्रानें सीतेला धाडलेल्या अन्नपाना संबंधानें असलेला सर्ग. तसेंच एखाद्या वीराची उत्पत्तिकथा दिली नाहीं व ग्रंथ त्यामुळें पुढील कवीस अपुरा वाटला तर तो भाग त्यानें नवीन घातला आहे. असे सर्ग उत्तरकांडांत बरेच आहेत.

कितीएक प्रसंगीं एखाद्या आधुनिक कवीस एखाद्या सर्गांतील श्लोकांचा अर्थ निराळ्या वृत्तांत लिहावा असें वाटून त्यानें ते तसे श्लोक रचून, पोथीच्या पृष्ठावर अगर दुसऱ्या एखाद्या पानावर लिहून ठेविले असावे. कालान्तरानें या पोथीची प्रत करणाऱ्या लेखकाच्या अज्ञानानें मूळचे अनुष्टुभ् श्लोक व तदभिन्नार्थ इतर वृत्तांतले श्लोक विचित्र माल्याभरणाप्रमाणें नवीन प्रतींत एकाच पृष्ठांत सारखे गोविले असावे. कचित् रूढीस विघातक गोष्टींना प्रचलित रूप दिलें असावें, असें वाटतें.

पण हे माझे तर्क मी भीत भीत आपणांपुढें ठेवीत आहें. या प्रक्षिप्ताचा विचार करितांना निरनिराळ्या प्रांतांत प्रचलित असलेल्या निरनिराळ्या काळीं लिहिलेल्या रामायणाच्या पोथ्या ताडून पहावयाला पाहिजेत. तसेंच रामायणांतील उतारे ह्मणून इतर कवींनीं आपल्या ग्रंथांत घेतले आहेत, ते उप-लब्ध रामायणाच्या प्रतींत आहेत कीं काय याबद्दल शोध केला पाहिजे. असें केल्यावर मग अंतरंग पुराव्यावरून कोणते श्लोक प्रक्षिप्त असावे याबद्दल तर्क केला पाहिजे. इतकें सर्व

करण्याला मजजवळ सामग्री नाहीं, व फारसा वेळही नाहीं; तसेंच, असलें काम करण्याचा अभ्यास पाहिजे तोही मला नाहीं.

तरी जो प्रक्षिप्त भाग ठरलेला आहे, त्याची व काढविलेल्या दुसऱ्या आवृत्तीच्या रामायणांतील मूळाची, जवळ जवळ ठेवून पाहणी केली, तर भाषेंत व वृत्तांत जरी थोडा बहुत फरक दिसून येतो, व संदर्भ जुळवायाला पंचाईत पडते, तरी विचारांत फारसा फरक दृष्टीस पडत नाहीं. हा मी रूढीचा प्रभाव समजतों. जुनी रूढि नवीन कवींच्या अंगांत इतकी खिळली होती कीं, त्यांचे विचार पूर्वींच्या कवींच्या विचारांहून फारसे भिन्न दिसून येत नाहींत.

## रामायण काल.

वर मीं ह्मटलें आहे कीं हल्लींचें रामायण मनू नंतर व बुद्धाच्या पूर्वीं झालें असावें. असें ह्मणण्याला आधार काय? या विषयीं आतां विचार करूं.

रामायणांत मनूचा नामनिर्देश आहे, व मनूच्या काळीं प्रचलित असलेल्या सर्व आचारविचारांशीं रामायणांतील आचारांचा समकालीन संबंध आहे. बुद्धाचीं मतें प्रचलित झालेलीं दिसत नाहींत. परंतु कोणतीही धर्माची उत्क्रान्ति आकस्मिक होत नाहीं. तिला कांहीं पूर्वींची तयारी लागते. या न्यायानें जीं मतें बुद्धानें आपलीं ह्मणून प्रतिपादिलीं तशीं वेदाला अप्रमाण ह्मणणारीं व इहलोकापलीकडे दुसरा लोक नाहीं, असें प्रतिपादन करणारीं मतें थोडीं बहुत झळकूं लागलीं होतीं. ( पहा जाबालीचें भाषण २, १०८ ) या मतांचें निरसन रामानें पुढील सर्गांत केलें आहे. त्यांतील ३४ श्लोकार्ध असा आहे.

यथा हि चोरः स तथाहि बुद्ध—
स्तथागतं नास्तिकमत्र विद्धि ॥

हा श्लोक सर्गाच्या अंतीं भिन्न वृत्तांत असल्या कारणानें प्रक्षिप्त असावा असें बहुतेक समजतात. बुद्धाच्या नंतर " श्रमणक " ह्मणून बुद्धभिक्षु प्रसिद्धीस आले, तसे श्रमणक या वेळीं नसावे. तापस आणि श्रमण यांचा एका श्लोकांत भिन्न भिन्न निर्देश केला आहे, हें खरें. पण श्रमण द्विजातिव्यतिरिक्त असत, ते बुद्धमतांचे जनक आहेत, असें येथें मला डा. भांडारकर यांनीं सांगितलें. रामचंद्राची वाट पाहत बसणारी दक्षिणेंत एक " श्रमणा " होती, परंतु ती अग्निकाष्ठ भक्षण करून स्वर्गाला गेली असें म्हटलें आहे. तेव्हां तिचा पुढील श्रमणांशीं अर्थाअर्थीं संबंध नसावा.

## वीरकाल.

रामायण काल हा वीरकाल ( heroic age ) होय. या वेळीं चातुर्वर्ण्य होतें, व ब्राह्मण पहिल्या पदास चढलेले होते हेंही खरें. या काळाच्या पूर्वीं ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचीं दारुण युद्धें होऊन कधीं क्षत्रियांस व कधीं ब्राह्मणांस विजय प्राप्त झाला होता. वसिष्ठविश्वामित्रांचें भांडण, ज्यांत विश्वामित्रानें आपल्या तपोबलानें ब्रह्मदेवास व वसिष्ठास तूं ब्रह्मर्षि आहेस असें ह्मणावयास लाविलें, तसेंच भार्गव परशुरामानें निःक्षत्रिय पृथ्वी केली, व त्यास ही दाशरथी रामानें निस्तेज केलें, या कथा या भांडणाची साक्ष देतात. पण दाशरथी रामाचा विजय झाल्यापासून समेट झालेला दिसतो.

## ब्राह्मण व क्षत्रिय यांचा समेट.

ब्राह्मण सर्व वर्णांत श्रेष्ठ. त्यांना सर्वांनीं मान द्यावा, त्यांनीं अध्ययन करून राहावें, यज्ञयागादिकांत पुढारीपण घ्यावें,

राजाचें गुरु व्हावें, दक्षिणा घ्यावी; पण राजकारभारांत फारसा हात घालूं नये. हा सर्व अधिकार क्षत्रियांनीं चालवावा. अशा अटीवर किंवा समजुतीवर मनूच्या काळीं व्यवस्था सुरू झाली होती असें वाटतें.

रामायण कालीं आर्य उत्तरेकडून दक्षिणेकडे स्वारी करूं लागले. सीताहरण व रावणवध हें दक्षिण दिग्विजयाचें लक्षण होय. कोसलदेश समृद्ध होता व दशरथ आपलें साम्राज्य सर्व देशांवर आहे असें ह्मणे. पुत्रेष्टीच्या वेळीं मांडलिक राजे त्यानें बोलाविले होते. त्यांत दाक्षिणात्यांचा उल्लेख आहे. हे काळे होते. राम दक्षिणेंत गेला व रावणानें सीता चोरून नेली, तेव्हां सुग्रीवाशीं अग्निसाक्षिक सख्य करून त्याचा भाऊ वाली यास बाणानें मारिलें, तेव्हां वालीनें मरतेवेळीं तूं कामचार आहेस, निरपराध्यास दंड करून पातक जोडीत आहेस, तेव्हां नरकास जाशील, असा त्याचा अधिक्षेप केला. तेव्हां राम ह्मणतो, "ही सर्व भूमि सशैलवनकानना इक्ष्वाकूंची आहे, तिचें पालन हल्लीं भरत करीत आहे. भरताच्या आज्ञेनेंच मी दंडार्हांना दंड करीत आहें. तूं धाकट्या भावाच्या पत्नीशीं तो जिवंत असतां रत झालास ह्मणून तुला दंड योग्य आहे" ( ४—१८ ). या दक्षिणदिग्विजयाचें श्रेय माझ्या मतें एकाअर्थी अगस्त्य ऋषीला देतां येईल.

## अगस्त्य.

अगस्त्य आणि त्याचा बंधु यांनीं दाक्षिणात्यांत आपले आश्रम स्थापून अनार्यांना आर्यधर्माची दीक्षा दिली असावी असें वाटतें. ज्यावेळीं आर्यांची संख्या दक्षिणेंत कमी होती, त्यावेळीं अगस्त्य ऋषीसारख्या दूरदृष्टि मुनींस अनार्यांस आर्यधर्मांत घेण्याला अडचण वाटली नसावी. अनार्यांचा अर्थात्

धर्म निराळा होता, त्यांना हा वैदिक धर्म व इष्टि आवडत नसत; ह्मणून त्यांचा उच्छेद करण्याकरितां हे अनार्य मुख्यत्वें रात्रीं मांसखंडें घेऊन जात व यज्ञवेदिका दूषित करीत. या निमित्तें आर्य अनार्य यांचीं भांडणें होत. ऋषींना आपलें तपोबल कमी वाटे ह्मणा, अगर व्यर्थ खर्च करणें बरोबर नाहीं, अशा हेतूनें ह्मणा, कोणा तरी राजाकडे जाऊन त्याच्या क्षात्र बळाची याचना करावी लागे. विश्वामित्रानें याच कारणा-स्तव रामलक्ष्मण दशरथाकडून मागून घेतले. व याच कारणा-स्तव अगस्त्यानें रामाला दिव्यायुधें दिलीं असावीं. व रामरावण युद्धाच्या प्रसंगीं राम थोडा निरुत्साह झाला असतां त्याला आदित्यहृदय पढवून त्याला प्रोत्साहन दिलें असावें. अगस्त्याच्या कथेंत जीं तीन अद्भुत व आपणांस या कालीं असंभाव्य वाटणारीं कृत्यें आहेत, ह्मणजे १ विंध्यपर्वत उंच उंच वाढत चालला होता त्याला वाकविलें, २ नरमांसभोजी आतापी व इल्वल अथवा वातापी यांस ठार मारिलें, ३ समुद्रप्राशन केलें, त्यांच्या मूळाशीं दक्षिण देश वसवून अनार्यांना आर्यधर्मांत आणिलें हाच सत्यांश असावा. १ विंध्यपर्वताला वाकविलें याचा अर्थ आजपर्यंत आर्य लोक आर्यावर्तांत ह्मणजे हिमवान् व विंध्यपर्वत यांमधील प्रदेशांत राहत होते, ते अगस्त्यप्रमुख होऊन दुर्गम विंध्याचल चढून व उतरून दक्षिणेकडे आले. २ अनार्य लोक आर्यांचा संहार करीत त्यांचा नाश केला. ३ समुद्रामध्येंही नावा वगैरे टाकून जाण्याचा मार्ग सुगम केला. "समुद्र प्राशन केलें" हें माझ्या मतें अलंकारयुक्त भाषण असावें. जसें इंग्लिशमध्यें "काल व अवकाश यांचा विध्वंस कर-णारी" असें उपपद विजेस लावितात, तसेंच हें उपपद सेतु, नावा, वगैरेची योजना करणाऱ्या अगस्त्य ऋषीस लाविलें

असावें. अरसिक पुढच्या लोकांची, अगस्त्यानें खरोखरच समुद्र पिऊन टाकिला अशी समजूत श्रद्धा–जाड्यानें झाली असावी. इतकीं कृत्यें त्यानें केलीं त्यास आकाशांत नक्षत्ररूपानें वास मिळावा यांत नवल नाहीं. हल्लींच्याही काळांत हर्शेलप्रभृति ज्योतिः-शास्त्र विशारदांस ज्योतिर्गणांत स्थान मिळतेंच. हा दक्षिणदिग्विजय ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्या संमेलनानें झाला, व त्याला अनार्यांचें साहाय्य होतें, असें मला वाटतें. वरील विवेचनावरून मीं, वाल्मीकीचे राक्षस, कपि, ऋक्ष, गोलांगूल यांस अनार्यांत गणिलें आहे, असें आपल्या लक्षांत येईल. वाल्मीकीनें जरी यांस राक्षस इत्यादि ह्मटलें आहे, तरी कित्येक स्थलीं हे राक्षस, कपि इ. आपआपणांस मनुष्याचे दाखले देतात अशीं कांहीं स्थळें आहेत. उ०

## सुग्रीव.

अरयश्च मनुष्येण विज्ञेयाश्छद्मचारिणः । ४,२,२२.

## रावण.

वामःकामो मनुष्याणां यस्मिन् किल निबध्यते ।
जने तस्मिंस्त्वनुक्रोशः स्नेहश्च किलजायते॥५,२२,४.

इतकें कबूल करणें भाग आहे कीं, अशीं वचनें सुभाषितासारखीं आहेत, आणि अशा स्थळीं “ मनुष्य ” याचा “ मनन करणार ” असा धात्वर्थ घेऊन निर्वाह करितां येईल.

आतां या वीर काळांतील लोकस्थितीविषयीं विचार करूं. प्रथमतःलोकांची **राष्ट्रीय स्थिति** कशी होती हें पाहूं.

ब्राह्मण आणि क्षत्रिय हे सर्व वर्णांत श्रेष्ठ होते ह्मणून वर ह्मटलेंच आहे.

द्विजातींत चार आश्रम असत; त्यांत गृहस्थाश्रम श्रेष्ठ होता. (२,१०६,२२). ब्रह्मचारी हा पहिला आश्रम, याचा काल

मुंजी पासून विद्याभ्यास संपल्यावर विवाह कालापर्यंत होता. असें असून लक्ष्मणास ब्रह्मचारी असें ह्मटलें आहे. तें कसें हें समजत नाहीं. नुसता व्रतस्थ राहणारा इतकाच अर्थ घेतला पाहिजे. वानप्रस्थाश्रमाचें व्रत रामानें वनवासांत पाळिलें आहे. जटा व वल्कलें धारण करून राहणें, फळ मूळावर राहणें, कुशास्तरणावर निजणें, आणि पत्नीसहवासांतही व्रतस्थ राहणें, हीं या आश्रमाचीं लक्षणें समजतात. मांसाहार ही या आश्रमांत निषिद्ध आहे; परंतु राम हें व्रत पाळीत होता असें दिसत नाहीं. मृग, मत्स्य आणि पक्षी यांचें मांस त्यास चालत असे. टीकाकारानें मसाले घालून शिजवलेलें मांस खाऊं नये इतकाच निर्बंध समजावा असें म्हटलें आहे. ऋषि हे गृहस्थाश्रम करून राहणारे व तसा आश्रम करून न राहणारे असे असत. गृहस्थाश्रम न करणाऱ्यांत पुष्कळ प्रकार सांगितले आहेत. १ फलमूलाशी यांतील प्रकार, कच्चें अन्न खाणारे, पानांवर राहणारे, फक्त चाऊन खाणारे; २ तपश्चरणानें झालेले प्रकार, पाण्यांत आकंठ राहून तप करणारे, भूमीवर आस्तरण न घालतां निजणारे, उन्निद्र तप करणारे, पाण्यावर अथवा वायुभक्षण करूनच तप करणारे, उघड्या जागेवर निजणारे, स्थंडिलावरच शयन करणारे, गिरींवर निजणारे, ओलेत्यानें तप करणारे, अक्षयीं जप करणारे, अक्षयीं स्वाध्यायाध्ययन करणारे, ग्रीष्मांत पंचाग्नि, मध्यस्थ होऊन तप करणारे. मुंडी, दंडी परिव्राजक असे ही भेद आहेत.

महर्षींच्या अंगीं तेज असून त्यांना ध्यानयोगानें अतीत, अनागत व वर्तमान काळच्या, जवळच्या, व दूरच्या गोष्टी समजत, तसेंच योगबलानें त्यांना पाहिजे ते पदार्थ उत्पन्न करून अभ्यागतांचा आदर सत्कार करितां येई, अशांचीं बरींच

उदाहरणें आहेत. भरद्वाजानेंससैन्य भरताचा केलेला सत्कार हें एक उदाहरण पुरें आहे.

ब्राह्मणाची योग्यता व अधिकार याकाळीं कमी होत चालला होता, असें अनुमान करावयास जागा आहे.

**नाविद्वान्नच नास्तिकः१,६,८.**

**नाषडङ्गविदत्रासीन्नाव्रतो नाबहुश्रुतः**
**सदस्यास्तस्य वै राज्ञो**
**नावादकुशलो द्विजः ॥ १,१४,२१.**

अशा प्रकारचीं दोन निषेधवाचक शब्दांनीं केलेलीं विधानें संशयजनक असतात. दशरथाच्या राज्यांत कोणी ब्राह्मण अविद्वान् नव्हता, कोणी नास्तिक नव्हता, असें ह्मणणें स्तुतिपर दिसतें. यांतील मथितार्थ हा निघतो कीं, प्रत्येक ब्राह्मणानें विद्वान् असावें हें खरें, पण वस्तुस्थिति विपरीत होऊं लागली होती. दुसऱ्या उताऱ्यांत पुत्रेष्टीच्या वेळीं जमलेल्या विद्वानांत कोणी षडङ्ग न जाणणारे वगैरे नव्हते; याचा अर्थ विद्या कमी होऊं लागली असाच निघतो.

तसेंच " नामृष्टभोजी " ( १, ६–११ ), " सुग्रास ज्याला मिळत नाहीं, असा कोणीही नव्हता, " याच्या उलट गार्ग्य त्रिजटाचें उदाहरण आहे ( २, ३२, २९–४५ ). हा ब्राह्मण निर्धन होता, याची पत्नी तरुण असून मुलें पुष्कळ होतीं. हा जमीन नांगरून आपला चरितार्थ चालवीत असे, परंतु पोट भरेना ह्मणून रामाकडे आला होता.

**नित्यस्वाध्यायशीलत्वान्नान्यत् कुर्वन्ति किंचन ।**
**अलसाः स्वादुकामाश्च महतांचापि संमताः ॥२, ३२, १९.**

यांत आळशी, गोड खाणारे, व मोठ्यांनाही नित्य अध्य-

यन करण्यानें मान्य, अशा ब्राह्मणांना रामानें धर्म केला, असें म्हटलें आहे. हें हल्लींच्या भिक्षुकवृत्तीचें बीजच होय. यांतील स्वाध्यायशीलत्वाचा ऱ्हास कालेंकरून झाला, तेव्हां ब्राह्मण हल्लींचे बहुतेक भिक्षुक बनले.

यज्ञयागादिकांच्या वेळीं ब्राह्मणांना भूमिदान मिळत असे, तें याकाळीं ब्राह्मण घेतनासे झाले होते. भूमीबद्दल "निष्क्रय" घ्यावयाला तयार झाले होते (१, १४, ४८). येथें ही भूमि न घेण्याचें कारण स्वाध्यायनिरतत्वच दाखविलें आहे. हें निष्क्रयाचें बंड येथून पुढें पुष्कळच माजलें. इतक्या पुरातन काळीं पैसा सर्वार्थसाधनीभूत झाला हें पाहून आधुनिक अर्थशास्त्रज्ञांस समाधान वाटल्यावांचून राहणार नाहीं.

## क्षात्रिय.

ब्राह्मणाच्या खालीं क्षत्रिय येतात. यांना वेद पढण्याचा व वैदिक कर्मे करण्याचा व दान करण्याचा अधिकार होता. त्यांच्यापैकीं कांहींकांची उ० विश्वामित्राची, बिभीषणाची, मजल ब्रह्मज्ञानापर्यंत गेली होती. सामान्य क्षत्रियांचें काम म्हटलें म्हणजे युद्ध करण्याचें, आर्तांचा शब्द ऐकूं येऊं नये म्हणून क्षत्रिय हातीं धनुष्य घेतात असें राम म्हणतो. अक्षयीं युद्धांत गुंतलेल्या लोकांच्या अंगीं जे गुण किंवा अवगुण असतात ते रामकालीन क्षत्रियांत दिसत असत. समरांतून परत येणें लाजिरवाणें समजत. क्षत्रिय, साहसी व स्पष्ट बोलणारे असत. मृगयेचा यांना नाद असे. अंधारांतही शब्दावरून हे लक्ष्य भेदीत असत. क्षात्रतेज अंगांत असल्यानें हे अमर्षी असत. शत्रूंशीं सामना करण्याला अक्षयीं तयार. नसतीं कुरापत काढून वीर्यातिरेकानें चालून जात असत.

स्वाभिमान व स्वकुलभिमान, यांच्या अंगीं चांगला जागृत राहत असे. वडिलांना, वृद्धांना व पूज्यांना हे मान देत असत. युद्धामध्यें व राजसभेमध्यें बोलण्यांत चतुर असत. याच गुणांशीं संलग्न असलेले दुर्गुण कितीएक क्षत्रियांत आढळत. हे क्रूर असत. स्त्रीवर हात टाकूं नये, असा निर्बंध असे खरा, पण या वीरकालांत बऱ्याच सुंदर स्त्रियांचें धर्षण झालें असावें. रामचरित्रांतील सीताहरण हें एक निदर्शक पुरें आहे. तसेंच लोकांना त्रास देणें, त्यांची संपत्ति आणणें, हाही नित्यांतला क्रम असे. उत्तम क्षत्रियाचें चित्र "राम" ह्मणून वाल्मीकीनें रेखाटलें आहे.

## वैश्य व शूद्र.

क्षत्रियाखालीं वैश्य हे येत. त्यांच्याविषयीं रामायणांत फारसें सांगितलें नाहीं. हे व्यापार करीत. परदेशांतून खुष्कीनें अथवा जलमार्गानें नांवांतून माल आणवीत. यांच्या श्रेण्या असत, व त्यांवर जे मुख्य असत त्यांना "नैगम" ह्मणून ह्मणत. ते राजमंत्र्यांबरोबर राजदरबारांत जात व राजा त्यांची सल्लामसलत घेत असे. वैश्यांनीं क्षत्रिय सांगतील तसें वागावें, येवढें ह्मटलें आहे. हे तीन वर्ण "द्विजांत" मोडत व यांना वेदपठणाचा अधिकार असे.

वैश्यांच्या खालीं शूद्र येत. यांनीं इतरांची सेवा करावी येवढेंच ह्मटलें आहे. यांना वेदाधिकार नव्हता. परंतु यज्ञादिक समारंभांत द्विजांना तसेंच यांना, राजाकडून बोलावणें असे. व सर्वांचा समाचार यथास्थित होत असे. रामायणांत अनुलोम-विवाहाचें उदाहरण आहे. एका पंक्तींत सर्व वर्णांचे लोक बसत अशाबद्दल प्रमाण सांपडत नाहीं. एके स्थळीं

बसत येवढ्यावरून कांहीं सिद्ध होत नाहीं. तरी निषादपति जो गुह त्यानें रामाला सर्व प्रकारचें अन्न (ओलें, कोरडें) समर्पिलें. त्यानें घेतलें नाहीं ही गोष्ट निराळी–तसेंच भरताच्या सैन्याचें त्यानें अन्नपान देऊन आदरातिथ्य केलें. या गोष्टी लक्षांत ठेवण्या जोग्या आहेत. निषादाची जात अतिशूद्रांत गणीत. असें असून त्यांचा पति रामाचा सखा होता.

## संकरजाति.

हे वैदिक काळापासून प्रचलित असलेले चार वर्ण या वीरकाळीं अबाधित होते, असें म्हणवत नाहीं. मनुस्मृतीस अनुसरून ही वर्णव्यवस्था वाल्मीकीनें पाळिली आहे. परंतु या वेळीं संकर जातींचा उदय झाला होता असें दिसतें. जाति शब्द या काळीं अयथार्थ असेल तर धंदे हा शब्द योजिला असतां चालेल.

आर्य लोक कोसलासारख्या सुसंपन्न देशांत येऊन राहिले तेव्हां पासून त्यांची अर्थात्च सुधारणा वाढत चालली. कुटजांचे सात चौकी वाडे बनले. पायवाटांच्या रथ्या बनल्या. वनांचीं उपवनें झालीं, अंटवीचें क्षेत्र झालें. साळ, गहू, हरभरा, तीळ, मूग, कुळीथ, उडीद (७,९,११,) हीं पिकूं लागलीं. रेशीम, लोंकर, कापूस व सण यांचीं वस्त्रें होऊं लागलीं. सुवर्ण, रजत, लोहादि पंचधातु, वज्र, इत्यादिकांचे दागिने व भांडीं होऊं लागलीं. व्यापार वाढला, कलांचा उदय झाला; राष्ट्रांत शांतता होऊन सुखें वाढलीं, लोकांचे ऐष आरामाचे मार्ग वाढले, तसे नवीन धंदे निघाले. या सर्वांचा अंतर्भाव प्रथमतः वैश्य शूद्र यांमध्यें करीत असत. परंतु हळू हळू प्रत्येक धंद्यानें आपल्या भोंवतीं जी लहानशी

मर्यादा घातली तीच सक्त होऊन पुढें दुरतिक्रम झाली, व धंद्याची जात बनली. रामायणांत ज्या धंद्यांचा उल्लेख आहे, त्यांची यादी पुढें दिली आहे. माझ्या दुर्लक्षानें कांहीं धंदे यांतून वगळले असतील. परंतु याद बरीच मोठी आहे व त्या काळच्या धंद्यांच्या स्वरूपांची ओळख करून देणारी आहे.

स्थपति–याच्या हाताखालीं शिल्पक वगैरे काम करीत.

शिल्पक–कामाची योजना करणारे–विषम मार्ग सम करणारे (२,७,९३).

वृक्षतक्षक–वृक्ष कापणारे.

वर्धकि–तक्षकांतील भेद असावा–वऱ्हाडांत सुतारांना वाढी म्हणतात–साधें काम करणारे सुतार.

कर्षक–शेतकरी.

खनक खणणारे.

दुर्गविचारक–घाटाडे.

सूत्रकर्मविशारद–सुतारांतील पोट भेद.

यन्त्रक–जलप्रवाह बांधणारे कारंजकर.

भूमिप्रदेशज्ञ–जमीनींत पाणी कोठें आहे वगैरे सांगणारे.

भक्त–रोजी घेऊन राहणारे मजूर.

विष्टी–सामान्य मजूर.

कर्मान्तिक महिन्यानें वेतन घेऊन राहणारे नोकर वगैरे.

यन्त्रकोविद–यंत्रें ( फेकण्याचीं वगैरे ) तयार करणारे.

सूपकार–स्वयंपाकी.

सुधाकार–चुना करणारे.

वंशचर्मकृत्–बुरूड.

नट–नाटकांत सोंग घेणारे.

गणिका–कलावंतिणी.

नर्तक–नाचणारे.

श्रेणीमुख्य–व्यापाऱ्यांच्या हरएक गणाचा मुख्य ( हा मात्र धंदा दिसत नाहीं. )

वादित्रकुशल–बजवय्ये.

सूत–१ पुराण सांगणारे.
 २ रथ हाकणारे.

मागध–वंशावळी कीर्तन करणारे भाट.

वैतालिक–राजांना जागे करणारे.

गणक–ज्योतिषी–जोशी.

दैवज्ञ–वरच्या प्रतीचे जोशी असावे.

अयोध्येंतील शिल्पक २,८३,१२ व पुढें.

मणिकार–मण्यारी.

कुंभकार–कुंभार.

सूत्रकर्मविशेषज्ञ–साळी.

शस्त्रोपजीविन्–ढाल, तरवारी करणारे.

मायूरक–मयूर, शुक इत्यादि खेळणीं करणारे. किंवा मोराच्या पिसाचें काम करणारे ?

क्राकचिक–करवतानें कापणारे.

वेधक–मोत्यांना वगैरे वेज पाडणारे.

रोचक–काचेच्या कुप्या वगैरे करणारे.

दन्तकार–हस्तिदंती काम करणारे, ( पेट्या, वगैरे ) हस्ती-दंती कोरीव काम करणारे.

गन्धोपजीविन्–गन्धी.

सुवर्णकार–सोनार.

कंबलकारक कांबळे विणणारे.

स्नापक —⎫ न्हावी,
उष्णोदक—⎭ अंग मर्दन करून स्नान घालणारे.

वैद्य—

धूपक-गन्ध्यांतील भेद अथवा अगरबत्त्या वगैरे तयार करून विकणारे.

शौंडिक—मद्य तयार करणारे.

रजक—धोबी ( किंवा रंगारी. )

तुन्नवाय—शिंपी.

ग्रामघोषमहत्तर—गांवचे व खेड्याचे पाटील [हा शब्द चित्रळचा मेहतर (Mehter) व मेहता (गुजराथी) यांत आढळतो]

शैलूष—नटांतील भेद दिसतो, भाडखाऊ, हिजडेनाच्यापोऱ्या, यालाच जायाजीव असें २,३०,३, मध्यें सीतेनें म्हटलें आहे.

कैवर्तक—मासे धरणारे कोळी.

रूपाजीवा—रांडा.

श्मश्रुवर्धक—हजाम.

इतक्या सर्व जाती किंवा हे सर्व धंदे करणारे लोक आर्यांत मोडत. यांच्या पलीकडे निषाद, चंडाल, मृतपा, आभीर आणि दस्यु हे अनार्यांत गणले जात असत. निषाद पारध करीत अगर कोळ्याचें काम करीत. चंडाल नीलवस्त्र परिधान करून लोखंडाचे अलंकार घालीत. यांचे केस मोकळे असत. आभीर ( आलीकडील आहीर-गाढव हाकणारे कुंभार ) व दस्यु ( चोरी करणारे) हे अनार्यच होत. दस्यूचा अर्थ चोरी करणारा हा पाठीमागचा आहे. यांशिवाय

अनार्य लोक रामायणांत आले आहेत, त्यांचीं नांवें- शक, यवन, कांबोज, बर्बर, म्लेंच्छ. " पह्लव " या लोकांचा उल्लेख आहे, व रामायणांत त्यांचें नांव वर सांगितलेल्या लोकांतच घातलें आहे. पण हे खरोखर आर्यवंशापैकीं होत. यांची भाषा पह्लवी किंवा झेंद; ही संस्कृत भाषेची जवळची बहीण म्हणून डा० हौ यांणीं सिद्ध केलें आहे.

अनार्यांविषयीं आर्यांचा मोठा तिरस्कार असे. त्याची साक्ष ही आहेकीं " अनार्य " हा शब्द शिवी दाखल योजीत. " अनार्यजुष्टमस्वर्ग्य " ही शब्दांची दुकल संस्कृतवाङ्मयांत प्रसिद्ध आहे.

आर्य व अनार्य जाती, ज्या एका राजाच्या अमला खालीं असत त्यास राष्ट्र म्हणतां येईल. या राष्ट्राचा अधिपति राजा, कोसल देशाचा राजा सम्राट् असे. ह्मणजे त्याच्या ताब्यांत इतर मांडलिक राजे असत. हे नियमितपणें किंवा मागणी येईल तेव्हां करभार देत असत. युवराजाभिषेक, किंवा हैयमेध इत्यादिक मोठे समारंभ होत, त्यावेळीं यांना आमंत्रण होत असें, व यांच्याकडे कांहीं कामें वाटून दिलीं असत. मोठ्या राजकारणांत यांची सल्लामसलत राजा घेत असे. परंतु स्थानिक राज्यकारभारांत तो हात घालीत असे, असें दिसत नाहीं.

कोसल देशांत राजाचा अधिकार चांगला बसला होता. अराजकाचे अनर्थ रामायणांत चांगले वर्णिले आहेत (२,६७). राजा नसेल तर स्वत्व राहणार नाहीं व सर्व एकमेकांस मत्स्याप्रमाणें खातील, व्यापार बंद होईल, योगक्षेम चालणार नाहीं, सत् किंवा साधु, असत् किंवा असाधु, यांची

निवड व्हावयाची नाहीं, सत्य व धर्म यांची प्रतिष्ठा व्हावयाची नाही; इतकेंच नाहीं, तर उत्सव, समाज, वनांत आणि उपवनांत होणारी चर्चा व शास्त्रवाद, यात्रा, वगैरे सर्व बंद पडतील. एका–वाक्यांत त्या वेळचें राजा संबंधी मत संगृहीत केलें तर असें ह्मणतां येईल कीं राजा हा राष्ट्राचा पिता. पिता ज्याप्रमाणें आपल्या मुलांचें लालन पालन करितो त्याप्रमाणें राजानें आपल्या प्रजेचें लालन पालन केलें पाहिजे. त्यास या जगांत देवाचा अवतारच मानीत. यम, कुबेर, शक्र व वरुण यांचे दंड, दातृत्व, पालन व नियमन हे विभक्त गुण त्यामध्यें एकवटून त्यांत वृत्तसंपन्नतेची भर पडल्यानें तो यांहूनही अधिक आहे, असा समज असे. त्याचा अधिकार सर्व प्रजेवर चालत असे. अनुग्रह–निग्रह करण्याला तो समर्थ असे.

सल्लामसलत करण्याला त्याला सचिव, वृद्ध ऋषि, पौरांतील श्रेष्ठ नैगम हे असत. पौर आणि जानपद यांमधील भेद यावेळीं दृढ झाला होता. पण या अधिकाऱ्यांची जी सभा होती तिला कांहीं हक्क असतील अशी आपली समजूत झाली तर ती चुकीची होईल. रामाला यौवराज्य देण्याचा निश्चय करून आपलें मत पौरजानपदांस पसंत पडतें काय हें पाहण्याकरितां दशरथानें ही सभा भरविली. त्या वेळीं त्याचें भाषण हितकर, सर्वांना ऐकूं येण्याजोगें व आनंदजनक झालें. त्यांतील भावार्थ असा—" इक्ष्वाकुवंशांतील राजांनीं पुत्रवत् आपलें पालन केलें, तसें मीं ही केलें. मी आतां वृद्ध झालों आहे. तेव्हां माझी अशी इच्छा आहे कीं हें राज्य-कारभाराचें ओझें रामावर टाकून आपण मोकळें व्हावें. मला वाटतें आहे कीं त्याच्या हातून हें काम झेपेल, तर आपलें

मत माझ्या मता प्रमाणेंच असेल तर मला अनुमत द्या. कारण,

[ यद्यप्येषा मम प्रीतिर्हितमन्यद्विचिन्त्यताम् ।

अन्या मध्यस्थचिन्ता तु विमर्दाभ्यधिकोदया ॥ ]. २,७९,१६

मला जरी हा विचार गोड वाटत आहे तरी, आपणाला दुसरा विचार गोड वाटत असेल तर सांगा. आपण तटस्थ अहां. आपणांला या प्रकरणांत रागद्वेष नाहीं. तेव्हां आपला विचार पूर्वापरपक्षांच्या संघर्षानें दुसरा, व माझ्या विचाराहून जास्त शहाणपणाचा, असण्याचा संभव आहे.–" यांत पौरजानपदांना दशरथानें मोठेपणा दिला हें खरें, व लोकांनीं त्याचें अभिनंदन करून आपला रुकारही दिला. पण उलट उत्तर दिलें असतें तर दशरथानें रामाला युवराज केलें नसतें काय? मला वाटतें केलें नसतें असें नाहीं. "राजा देवांचा अवतार." त्यानें मनास वाटेल तें केलें असतें. प्रजेचें अनुमत मिळालें तर दुधांत साखर इतकेंच. न मिळालें तरी दूध गोड तें गोडच. कारण कैकेयीनें वरदान पुढें केल्यानें हा अभिषेकाचा व्यूह ढासळला, तेव्हां राजानें नाखुषीनें म्हणा, कसेंही ह्मणा, रामाला अरण्यांत पाठविण्याचा निश्चय केला. तेव्हां ही सभा कोठें होती? तिचें अनुमत कोठें गेलें? स्वत: दशरथच ह्मणतो " पापिणी कैकेयीनें आग्रह धरिल्यानें मीं वृद्धांचा व मन्त्र्यांचा विचार घेतला नाहीं. मित्रांना, अमात्यांना, व नैगमांना पुसलें नाहीं. स्त्रीनिमित्तें मोहानें हा अर्थ एकदम ( विचार न करितां ) घडवून आणिला." जो राम प्रजेला आपल्या पुत्राप्रमाणें लेखी, त्यांच्या उत्सवानें आनंदित होत असे, व त्यांना दु:ख झालें कीं दु:खी होत असे, त्याला वनवासास प्रजेला न विचारितांच नव्हे, तर प्रजेच्या मताविरुद्ध, दशरथानें धाडिलें. या उदाहरणाशिवाय दुसरें उदाहरण

राजाच्या अप्रतिहत सत्तेचें अथवा स्वैर वर्तनाचें कोणतें देतां येईल ? दशरथानें गोड गोड भाषण केलें खरें. पण त्यांत अर्थ नव्हता. वनाला राम गेला तो गेलाच. लोकांनीं काय केलें, तर मुळू मुळू ते रडले. त्याच्या पाठीमागून गेले. राम चुकवून गेला तेव्हां परत आले.

वनवासास पाठविलेल्या दुसऱ्या एका इक्ष्वाकुवंशांतील राजपुत्राचें उदाहरण रामायणांत दिलें आहे. तो रस्त्यांतील बालकें उचलून सरयूंत बुडवी, आणि खदखदां हसे. या जुलमाला त्रासून लोकांनीं राजाकडे गाऱ्हाणें नेलें आणि ह्मटलें "राजा असमंजाला घे, नाहीं तर आह्मांला घे." तेव्हां राजा सगरानें त्याला वनास धाडिलें ( १,३८,२०-२२;२,३६,२०-२४, ). येथेंही लोकांना अधिकार काय तो गाऱ्हाणें नेण्यापुरताच होता. राजा दयाळू असेल तर लोकांचें ह्मणणें मनावर घेई. खरोखर इह लोकींचा त्याला आळा नव्हता. परलोकींचा धर्मशास्त्रांत घातला होता. त्यांत प्रजेचें धर्मानें पालन न केल्यानें प्रजा स्वैर होऊन जीं पातकें करील त्यांच्या षष्ठांशाचा वाटेकरी राजा होतो, हा एक होता. तसेंच राज्यांत कांहीं अनर्थ घडले तर ते राजाच्याच दोषानें घडतात, असा सर्व साधारण समज असे, व तो पापभीरु राजांना प्रतिबंधक असे ( ७,७३,१६ ).

राजाच्या पाठीमागून त्याचा वडील मुलगा गादीवर बसतो हा सामान्य नियम होता, व इक्ष्वाकुवंशांत ठरल्या सारखा होता (२,७३,२२;२,११०,३६). केव्हां केव्हां मृतराजाचा मुलगा लहान असेल व त्याला राज्य आकळतां येणार नाहीं अशी भीति असेल तर मृतराजाचा धाकटा

भाऊ गादीवर बसत असे. रामाला वनवासास पाठविण्याचा निश्चय झाला, कैकेयी सीतला चीवरें ( वल्कलें ) देऊं लागली, तेव्हां तिचा निषेध करून वशिष्ठ ह्मणतो " राजाला फसवून तूं वर घेतले. पण तूं तरी आपल्या बोलाप्रमाणें कोठें राहतेस? सीतेला वनास जाण्याचें कांहीं कारण नाहीं. रामाचें प्रकृत आसन (यौवराज्य) सीता घेईल. सपत्नीकाची पत्नी ही त्याचा आत्मा होय. सीता रामाचा " आत्मा " ह्मणून ही मेदिनी पाळील." हें ह्मणणें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. भर्त्याचे मार्गे पत्नी भर्त्याचे अधिकार चालविण्याला समर्थ असे, असें निष्पन्न होतें.

राजाला सल्लामसलत देण्याला सचिव असत. त्यांच्या अंगीं स्पष्ट बोलणें हा गुण समजत. दरबारामध्यें प्रकरणाचा ऊहापोह होत असे. एकाच्या ह्मणण्यावर दुसरा उत्तर देत असे, व शेवटीं राजा सर्वांच्या विचारांवर साधकबाधक गोष्टी सांगून आपलें मत देत असे. रामाला सर्वांचें मन न दुखवितां आपला पक्ष स्थापित करण्याची हातोटी चांगली होती.

देशाचें संरक्षण करण्याकरितां सैन्य असे. याचीं चार अंगें असत. पायदळ, घोडेस्वार, रथी, व गजारूढ. प्रत्येक पथकांत नियमित पायदळ, घोडेस्वार, रथी, गजारूढ अशी मर्यादा असे. व पथकांच्या संख्येवरून सैन्याला सेना, अनीक, अक्षौहिणी वगैरे नांवें देत. कवीनें पथकांची संख्या बरेच सहस्र दिली आहे तितकी रणांत येत असेल कीं नाहीं याबद्दल संशय आहे.

सर्व सैन्याचा नायक प्रायः राजा असे. राजाभावीं त्याचा बंधु, सुत अगर इतर आप्त असे. क्वचित् इतरही विश्वासुक

मनुष्य असे. लढाइचीं शस्त्रें म्हटलीं म्हणजे नानाप्रकारचे बाण, मुद्गर, चक्र, तोमर, गदा, असि, मुसल, शूल, परिघ, पट्टिश, पाश, भृशुंडी इत्यादि असत. या नांवांवरून या शस्त्रांची रचना वगैरे कळत नाहीं. परंतु बहुतेक शस्त्रें लोखंडाचीं असत, व हातांनीं वापरण्याचीं किंवा फेकण्याचीं असत. शतघ्नी ह्मणून एक हत्यार असे तें कोटावरून सोडीत. दारूचा शोध झाला नव्हता. तेव्हां सर्व भर सैनिकांच्या बाहुबलावरच असे. एके ठिकाणीं कुलपी गोळ्या सारख्या कूट शस्त्राचें वर्णन आहे. रथ्यींना रथांत बसून युद्ध करण्याला सवड चांगली असे, व रथाचीं वर्णनेंही चमत्कारिक आहेत. प्रत्येक रथांत शस्त्रास्त्र ठेवण्याची जागा असे. रथींवर हल्ला करावयाचा म्हणजे प्रथमतः रथाचा ध्वज पाडून टाकावयाचा. याचा हेतु असा दिसतो कीं ध्वज मोडला किंवा पडला म्हणजे सर्व सैन्य गर्भगळीत होऊन पळून जावें. अशी पळापळ झाल्याचीं पुष्कळ उदाहरणें रामायणांत आहेत. ध्वज पडल्यावर घोडे मारावयाचे किंवा सूत मारावयाचा, ह्मणजे रथीला विरथ होऊन पदातीप्रमाणें युद्ध करावें लागे. बाणांशिवाय अस्त्रें असत. बाण साधे व लोखंडाचे असत, त्यांना मागें पिसें दोन्ही बाजूंनीं असत. अस्त्र ह्मणजे अभिमंत्रित बाण, इतकाच फरक. यांचीं नांवें किती तरी आहेत. यांचा प्रयोग गुरुमुखावांचून करितां येत नसे. सामान्यतः एका अस्त्रावर दुसऱ्या विशिष्ट अस्त्राची योजना असे. उदाहरणार्थ पर्वतास्त्रावर वज्रास्त्र चालत असे, वाय्वस्त्रावर पर्वतास्त्र इ. इ. एके ठिकाणीं नैर्ऋत्यास्त्रावर वायव्यास्त्राचा प्रयोग झालेला आढळतो. अस्त्रासंबंधानें खरी माहिती कांहीं मिळत नाहीं.

कपिसेनचीं आयुधें वर दिलेल्या शिवाय वृक्ष, पाषाण, नख, दंत वगैरे सांगितलीं आहेत. रामायणांतील युद्धांचीं वर्णनें सरासरी सारखीं व कंटाळवाणी झालीं आहेत, इंद्रजिताला अग्नि प्रसन्न होऊन रथ देत असे. त्यांत तो बसला ह्मणजे शत्रूला अदृश्य व अवध्य होत असे, व तो कपटमायेचा प्रयोग करी असें ह्मटलें आहे. प्रच्छन्न राहून शत्रूवर हल्ला करीत असेल इतकीच गोष्ट या कथेला कदाचित् पाया असेल. रात्र झाली ह्मणजे राक्षसांचा (निशाचरांचा) प्रभाव द्विगुणित होतो, असें ह्मटलें आहे, याचा तरी तात्पर्यार्थ हाच दिसतो.

सेना चालली असतां तिच्या करितां व्यवस्था करण्याचा प्रघात होता. रस्ते विषम असतील तर सम करीत असत; छाये करितां वृक्ष लावीत, अरण्यांतून रस्ता चांगला नसेल तर वृक्ष कापीत; खडक फोडीत, पाण्याची सोय करीत. कोठें विहिरी करीत, तलाव करीत, व क्वचित् कालवेहि बांधीत. शिबिरांतील रस्ते नगरांतल्याप्रमाणें मोठे ठेवीत व त्यांवर सडा संमार्जन होत असे. प्रसंगीं पुष्पेंही टाकीत. तळ चांगल्या ठिकाणीं देत. कूच केल्यावर पूर्वीचा तळ जाळण्याचा परिपाठ असे–याचें कारण कदाचित् असें असेल कीं शत्रूला आपल्य तळाचा फायदा मिळूं नये. केवळ स्थलशुद्धी करितांही असें करीत असतील.

सैन्य मार्गांत असतां पुढें एक टोळी जात असे, तिचें काम हें कीं, शत्रूनें वाट रोधिली आहे कीं काय, आणि पिण्याचें पाणी दूषित केलें आहे कीं काय, हें पाहणें. सैन्याची आघाडी, पिछाडी व उजव्या व डाव्या बाजू यांचा बचाव करण्याकरितां एक एक टोळी नेमिली असे व सैन्यसंघ मधून

चालत असे. सैन्य बहुतकरून उत्तर रात्रीं चालत असे आणि सूर्योदयानंतर तळावर येत असे. ग्रामांना व नगरांना आपल्या सैन्यापासून उपद्रव होऊं नये ह्मणून रामानें गांव सोडून सैन्याच्या कूचाचे मार्ग काढावे. युद्ध पावसाळ्यांत चार महिने बंद असे.

युद्धांत पडलेल्या व घायाळ झालेल्या वीरांची व्यवस्था एका सेनाध्यक्षाकडे असे रामसेनेंत सुषेण हा वैद्य होता, त्याकडे हें कामदिलें होतें. मशाली लावून घायाळांचा शोध होत असे. मृतसंजीवनी (मृतांस उठविणारी), विशल्य करणी ( शल्य [ सळ ] बाहेर काढल्यावर क्षत भरून काढणारी ), सुवर्ण करणी ( पूर्वीची जिवंतपणची कळा आणणारी), व संधानी (तुटलेले, फाटलेले भाग जुळविणारी ), या नांवाच्या चार दिव्यौषधि हिमालयावरून मारुतीनें आणिल्या, आणि त्यांचा रस सुषेणानें पडलेल्या वीरांच्या नाकांत घातला, यामुळें ते उठले, अशी रामायणांत कथा आहे.

सैन्यामध्यें शिस्त फारशी होती असें दिसत नाहीं. नायक पडला ह्मणजे बहुतेक सैन्य पळून जात असे, हें वर सांगितलेंच आहे. मोठ्या प्रयत्नानें उद्धर्षक भाषणें करून नायक सैन्याला धीर देऊन फिरून लढाईला उभे राहण्याला लावीत. जय मिळाला तर शिस्तीकडे फारसें लक्ष नसे. हनूमदंगदप्रभृति वीरांनीं सीतेचा शोध लाविला, या हर्षभरांत कपिसैन्याकडून सुग्रीवाच्या मधुवन नांवाच्या बागेचा विध्वंस केला, व तोही सीतेचें वर्तमान कळविण्यापूर्वीं ! बागेचा रक्षक दधिमुख सुग्रीवापाशीं गाऱ्हाणें घेऊन गेला, तेव्हां सुग्रीवाची खातरी झाली कीं कार्य संपादिल्यावांचून त्यांनीं हा असा व्यतिक्रम केला नसावा; व तो दधिमुखास ह्मणाला

" काम करून आल्यावर सर्व मधुवन खाऊन टाकलें यांत मला आनंदच आहे. काम करून आलेल्याचा अविनय(धर्षण) पोटांत घातला पाहिजे (मर्षणीय) (५,६४). आपणांमधील हल्लींची शिस्तीसंबंधी वाण जुनी पुराणी आहे.

शत्रूवर हल्ला करण्यापूर्वी आपलें बलाबल पाहिलें पाहिजे. साम, दाम, भेद, दंड हे चार उपाय योग्य वेळीं उपयोगांत आणावे. दंड हा शेवटला उपाय आहे, असें सांगितलें आहे. राजनीतिसंबंधी रामानें भरतास जे प्रश्न केले आहेत(२,११०), त्यांतील बराच मोठा भाग प्रक्षिप्त असावा अशी मला शंका आहे. भरत भावाला पाहून निश्चेष्ट पडला असतां त्याला इतके राजनीतीसंबंधी प्रश्न दशरथाच्या मरणाची वार्ता कळल्यापूर्वी राम विचारील हे संभवनीय नाहीं. महाभारतांतील नारदनीतींतील कच्चित् प्रश्नांची ही टूम एखाद्या पुढील कवीनें रामायणांत घुसडून दिली असावी, अशी मला जबरदस्त शंका येते. ह्मणून या प्रश्नांतील माहिती मीं बहुतेक वगळली आहे.

शत्रूशीं लढाई करण्यापूर्वी शत्रूकडे दूत पाठवून आपलें काय ह्मणणें आहे हें सांगण्याचा परिपाठ असे. दूतानें सांगितलेलें काम केलें पाहिजे. पण दूत केवळ संदेशहारकच असे असें दिसत नाहीं. तो वकिलीही करी आणि सामोपचारही सुचवी. दूत प्रायः अवध्य असत. फार झालें तर त्यांला शरीरदंड करावा, इतकी सवड असे. दूतांहून चार निराळे. हे शत्रूकडील बातमी गुप्त वेषानें काढीत आणि आपल्या राजाला कळवीत. चार सांपडले तर त्यांचा प्रायः वध होत असे. रावणाचे चार कपींनीं व बिभीषणानें पकडले ते रामानें जीवंत सोडिले, हें त्याच्या औदार्याची किंवा स्वसैन्याच्या बळा-

विषयींच्या खातरीची साक्ष देतें. युद्ध नसे तेव्हां ही प्रांतांतील माहिती राजे लोक गुप्त चारांच्या द्वारें काढीत. सीते विषयींचा जनापवाद रामाला अशा चारांच्या मुखानेंच कळला.

राजा सत्य व धर्म यांचा प्रभव असें म्हटलें आहे. तेव्हां तो व्यवहार कसा चालवीत असे, याविषयीं आपणाला पृच्छा झालीच पाहिजे. अर्थी प्रत्यर्थी यांचें म्हणणें ऐकून राजा निवाडा देत असे. जानपदांत कशी व्यवस्था असे याबद्दल रामायणांत माहिती नाहीं. राजा सर्व अर्थींना सुगम असावा, व व्यवहाराचा निर्णय करण्याला फार उशीर लागूं नये, हीं तत्त्वें ठरल्यासारखीं होतीं.

दानाध्यक्ष, कोशाध्यक्ष या नांवाचे अधिकारी असत, व त्यांचीं कामें त्यांच्या नांवांवरून दिसतातच. हल्लीं सरकारांत जशीं निरनिराळीं खातीं आहेत तशीं त्यावेळीं असतील असें संभवत नाहीं. साधारणतः एकाच्याच हातांत सर्व सूत्रें असत, असें दिसतें. नगरांत हा सूत्रधार राजा असे. व ग्रामांत त्याचा प्रतिनिधि असे. जानपदाचे पोटविभाग असत, अशाबद्दल रामायणांत मला दाखला सांपडला नाहीं.

येथपर्यंत राष्ट्रीय स्थितीची माहिती दिली. आतां,

## सामाजिक स्थिती

संबंधानें काय माहिती मिळते ती पाहूं या. प्रथमतः स्त्रियांच्या स्थितीविषयीं विचार करूं.

कन्या पितृगृहीं राहून बऱ्याच मोठ्या वयाच्या होत. श्रीमंत घराण्यांतील कन्यकांना नृत्य, गायन, व वादन शिकवीत. पुरुषांना चित्रकला येत असल्याचा दाखला आहे, परंतु स्त्रियांना ही कला अवगत होती असें दिसत नाहीं. हल्लीं ज्या कलेवर

शिक्षणाच्या कामीं आपण भिस्त ठेवितों, ती लेखनकला रामायणकालीं प्रचलित होती असें दिसत नाहीं. " अध्ययन " " पठन " " वाचोविधेय " इत्यादि शब्द मुखोद्गत करण्याच्या परिपाठाची साक्ष देतात. " लिखन्ति " हा शब्द युद्धकांडाच्या शेवटल्या सर्गांत फलश्रुतींतील शेवटल्या श्लोकांत आला आहे. ही फलश्रुति वाल्मीकीची नाहीं, प्रक्षिप्त आहे, अशाबद्दल बरींच प्रत्यन्तरें आहेत.

कितव्या वर्षीं कन्येचा विवाह होत असे, हें खातरीनें सांगवत नाहीं. कुशनाभाच्या शतकन्या मारुतानें धर्षित केल्या, तेव्हां त्यांचा विवाह झाला नव्हता. रंभा, अरजा या ही धर्षणापूर्वी यौवनाक्रांत होत्या असा स्पष्ट उल्लेख आहे. सुमाली ही कैकसीला म्हणतो " मुली प्रदानकाल आला. यौवन अतिक्रांत होत चाललें आहे " सीतादि भगिनींचा विवाह झाल्या बरोबर, त्या " रेमिरे मुदिताः सर्वाः भर्तृभिर्मुदिता रहः " [१,७७,१४], या श्लोकार्धांतील "रहः" या पदानें भर्तृयोग्य वयाच्या होत्या असें दिसतें. तसेंच सीतेनें अनसूयेला आपला वृत्तान्त सांगितला आहे त्यांत " पतिसंयोगसुलभं वयः", असे शब्द आहेत, त्यांचा अर्थ सरळ घेतला तर तारुण्य असा होतो. पण " योग्य विवाहकाल " असा टीकाकार घेतात. तसेंच रावणाला सीता आपलें वनवासापर्यंतचें वृत्त सांगते त्यांत ती असें म्हणतेः—

" इक्ष्वाकूंच्या घरीं मी बारा वर्षें ( विवाहानन्तर ) राहिलें. तेराव्या वर्षी राजानें रामाला यौवराज्याभिषेक करण्याचें योजिलें. नंतर कैकेयीनें वरदान घेऊन आम्हांस वनवासाला धाडिलें. हल्लीं रामाचें वय २५ वर्षांचें आहे, व मी अठरा वर्षांची आहे " रामाचें वय विवाहाचे वेळीं सोळाहून थोडें कमी

होतें. तो वनवासास निघाला तेव्हां कौसल्या ह्मणते "याला झाल्याला १७ वर्षें झालीं." विवाहानंतर बारा वर्षें राम अयोध्येंत राहिला, तर २८ वर्षें होतात; ह्मणून टीकाकारांनीं शक्कल काढिली आहे कीं "झाल्याला" (जातस्य) याचा अर्थ "उपनयन झाल्याला--" ह्मणजे उपनयन कालींचें वर्ष क्षत्रियाचें ११ व हीं सतरा मिळून २८ वर्षे. जुळलें! पण सीतेनें रामाचें वय २५ वें सांगितलें याची वाट काय? टीकाकार पंचविसावें सांख्यतत्व जें चैतन्य तद्रूप राम आहे, असा करितात! दुसरी ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं सीतेचें हें ह्मणणें तेरा वर्षें वनवास भोगिल्या नंतरचें आहे; पण येथेंही टीकाकार "वनप्रवेशसमयीं" इतकीं वर्षें झालीं होतीं, असा अर्थ करून या विरोधीवचनांची व्यवस्था लावितात. युद्धकांडांत विवाहकालीं सीता बाला होती, व राम बाल होता असें ह्मटलें आहे.

माझ्या मतें हे विरोध प्रक्षिप्तमूलक असले पाहिजेत. रामायणाची वाढवून सुधारलेली दुसरी आवृत्ति तयार झाली, त्यावेळीं "अष्टवर्षा भवेत् कन्या" इत्यादि स्मृतिविहित वाक्यांच्या प्रभावाचें हें फळ असावें.

सीतेचा स्वयंवर झाला हें प्रसिद्धच आहे. सीता वीर्यशुल्का होती ह्मणजे वरानें वीर्य हें शुल्क देऊन वरावी, असें ठरविलें होतें परंतु, हल्लींची रामायणाची प्रत उपलब्ध आहे तीवरून स्वयंवरपद्धति वाल्मीकीला फारशी पसंत होती असें दिसत नाहीं. कुशनाभाच्या मुली मरुताला म्हणतात "पिताच आमचा प्रभु, तोच आमचें परम दैवत. पिता ज्याला आम्हाला देईल, तोच आमचा भर्ता होईल" (१, ३२, २२). सीता रावणाला आपला वृतान्त सांगते त्यावेळीं म्हणते "(रामानें

शिवधनु भंगिलें तेव्हां त्याला ) प्रतिज्ञेप्रमाणें मला दिलें पाहिजे, असें समजून बाबा मला देऊं लागले, तेव्हां अयोध्याधिपतिपित्याचा विचार (मर्जी–छंद) ठाऊक नसतां रामानें माझा प्रतिग्रह केला नाहीं." बालकांडाच्याही शेवटीं "बापानेंच करून दिली म्हणून सीता रामाला प्रिय होतीच (१, ७७, २६) असें म्हटलें आहे, याचा भावार्थ ब्राह्मविवाहच श्लाघ्य आहे, असें टीकाकार म्हणतो, तें खरें आहे. सीतेच्या बहिणींचे विवाह स्वयंवरानें झालेले नाहींत.

या विवेचनाचा निष्कर्षार्थ असा निघतो कीं, रामायणाच्या द्वितीयावृत्तीच्या काळीं स्वयंवर प्रचारांतून जात चालला होता, पित्याचे अधिकार वाढत चाललें होते, व ब्राह्म विवाह दिवसानुदिवस प्रशस्त वाटूं लागावयाला लागला होता. अर्थात्‌च पित्यानें अधिकार चालवायाचा तेव्हां कन्याविवाहवय अष्टम वर्षाकडे धांव घेत चाललें होतें. रावणाला सांगितलेल्या वृत्तांतांतील वय खरें धरलें तर सीता लग्नाच्या वेळीं सहा वर्षांची होती, व त्या वेळीं तिचा रामाशीं एकांतांत सहवास होत असे, असें सिद्ध होतें. पत्नीरुकारासंबंधी कायदा पास होण्यापूर्वीं जो वादविवाद झाला त्यांत हीं वचनें कोणी पुढें केलीं कीं नाहींत हें मला ठाऊक नाहीं.

रामायणकालीन विवाहांतील विधि सांगण्याची फारशी जरूरी दिसत नाहीं. गोदान वगैरे कांहीं विधि हल्लींहून निराळे असतील असें वाटतें. पण मधुपर्क, पाणिग्रहण व होम हे त्या वेळीं ही होते.

वर वधूच्या पितृगृहीं लग्नाला जात असे. त्याबरोबर त्याचा बाप, वृद्ध ब्राह्मण, राजा असेल तर कोशाध्यक्ष, बलाध्यक्ष वगैरे जात असत. पण चमत्कार हा वाटतो कीं वरमाय विहि-

णीच्या गृहीं जात नसे. सूनमुख लग्नानंतर स्वनगरास परत आल्यावर वरगृहीं होत असे. तेव्हां रुसणें फुगणें त्या वेळीं कमी असावें असें वाटतें. वऱ्हाडांत देशमुखांत वराची आई लग्नाला जात नाहीं. तरी रामायणकाळीं ही जामाताचा वरपक्ष तो वरपक्षच असे. कन्येच्या बापाला तिच्याबद्दल काळजी असेच. तीन कुळें ती संशयांत ठेविते असा सुमालीचा उद्गार आहे. कन्यापितृत्व पत्करण्याला त्या वेळीं ही कोणी मानकांक्षी खुषी असतील असें दिसत नाहीं (७,९,१०-२१). सीता ह्मणते "कन्येचा पिता शक्रतुल्य असला तरी आपल्या बरोबरीच्या व आपणाहून कमी अशा योग्यतेच्या व्याह्यापासून (ही) अपमान पावतो," तर मग, टीकाकार कैमुतिक न्यायानें ह्मणतो, आपणाहून वरिष्ठ अशापासून मानभंग पावेल हें बोलावयाला नको.

आतां पतिपत्नींचे संबंध कसे होते हें पाहूं. पति हा पत्नीचा देव. तो चांगला असो, वाईट असो, त्याला भजलें पाहिजे, हा सिद्धांत. हें शिक्षण घरीं कन्येची आई देत असे, पुढें सासू देत असे, व आप्तइष्ट यांच्या बायकाही देत असत. राम कौसल्येला ह्मणतो जीवंत स्त्रीला भर्ता दैवत आहे. ती त्याच्या मर्जीप्रमाणें न वागेल तर नरकास जाईल. भर्त्याची शुश्रूषा केली असतां स्वर्ग-प्राप्ति होते. मग देवाची पूजा वगैरे केली नाहीं तरी चालेल. भर्त्याचें प्रिय करावें, हित करावें, ह्मणून त्याची शुश्रूषा केली पाहिजे असें श्रुतींत सांगितलें आहे" (२,२४,२६-२८). स्त्रिया आपल्या पतींना किती मान देत असत हें वनवासाला जाण्यापूर्वी राम आणि सीता यांचीं भाषणें झालीं आहेत त्यांवरून कळून येईल. त्यांतून कांहीं वेंचे येथें देतों.

सीता ह्मणते “ पिता, माता, भ्राता, पुत्र, आणि सून हीं आपआपले पुण्याच्या जोरावर भाग्य पावतात, परंतु एकटी स्त्री भर्त्याचें भाग्य सेविते. ह्मणून आपणाला वनवास (पित्याच्या आज्ञेनें ) प्राप्त झाला तो मलाही झाला. स्त्रियांना पिता, पुत्र, माता, किंवा सखीजन गति देत नाहींत. इहलोकीं व परलोकीं स्त्रियांची गति एकच ह्मणजे पति आहे. आपण वनांत जाल तर मी ही कांटे तोडीत आपणा पुढें जाईन. सर्व अवस्थांत भर्त्याची पादच्छाया सेवणें हा उत्तम स्त्री-धर्म–हाच धर्म आईनें व बाबानें मला शिकविला आहे. वन हें बाबाचेंच घर समजून मी आपणाबरोबर राहीन. पतिव्रत लक्षून मी तीनही लोक तृणाप्रमाणें गणीन. आपली नित्य सेवा करून व ब्रह्मचारिणीचें व्रत आचरून आपणाबरोबर मधुगन्धि वनांमध्यें रमेन. फळें मुळें खाऊन राहीन; आपणाबरोबर राहिल्यानें कष्टी होणार नाहीं; आपणापुढें चालेन, व आपण खाल्ल्यावर मी खाईन.” रामानें वनवास फार कठीण आहे, तुला तो सोसणार नाहीं, ह्मणून मी तुला कांहीं नेणार नाहीं, असें ह्मटल्यावर सीता ह्मणते “द्विजांनीं व भिक्षिणीनें पितृगृहीं पूर्वीच भाकीत केलें होतें कीं मला वनवास भोगावा लागेल; ह्मणून मी त्याला अक्षयीं तयार आहें व तो मीं आवडेसा केला आहे. म्हणून तूं मला ने. नाहीं तर मी जीव देईन.” तरीही राम ऐकेना तेव्हां सीता रागावून म्हणते “बाबानें आपणामध्यें कोणतें वीर्य पाहिलें कोण जाणे. त्यांना जावाई मिळाला तो बाइल्या मिळाला! मी सावित्रीप्रमाणें आपणाबरोबर येईन. आपण मला फार दिवस जवळ राहिलेल्या भार्येस शैलूषाप्रमाणें (भाडखाऊप्रमाणें) दुसऱ्याला कसें देऊं इच्छितां? मी वन

आणि राजवाडा यांत अंतर मानणार नाहीं. आपण जेथें असाल तें स्थळ मला स्वर्ग, आपण नसाल तें स्थळ मला नरक होईल " (२,२८;१,२९;२,३०). कौसल्या सीतेला ह्मणते— "भर्त्यानें कितीही सुप्रसन्न ठेविल्या तरी तो थोड्याशाही विपत्तींत आला असतां दुष्ट स्त्रिया त्याला टोचतात व टाकूनही देतात. अशा असती स्त्रियांना खरेंपण नाहीं, हृदय नाहीं; त्या पापिणी आणि क्षणमात्र प्रीति करणाऱ्या असतात. त्या कूळ पाहत नाहींत, उपकार स्मरत नाहींत, आदिष्ट धर्म आचरीत नाहींत, अलंकार वगैरे देऊन समजावणी केली असेल ती लक्षांत आणीत नाहींत; असें त्यांचें हृदय चंचळ असतें. परंतु साध्वी स्त्रियांची गोष्ट निराळी, त्या शील, सत्य, कुलमर्यादा व श्रुतींनीं सांगितलेला धर्म,यांवर दृष्टि ठेवून पति हें आपलें परम पवित्र सर्व धर्मसाधनांहून विशिष्ट साधन असें समजतात " (२,३९,२०–२९). हा स्त्रीधर्म मला संमत आहे असें सांगतांना सीता भर्त्याला " अमितांचा दाता " असें ह्मणते (२०,३,३९). पति कसाही असो, शुभ असो, अशुभ असो, दुःशील असो, कामवृत्ति असो, आर्यस्वभावाच्या स्त्रियांना तो दैवतच आहे, असें ठिकठिकाणीं ह्मटलें आहे (२,११७,२४ इ.). अनसूयेला सीता आपले पतिधर्माविषयीं विचार सांगते, ते ही उदात्त आहेत —" मला माहीत आहे कीं, नारीचा गुरु पति होय. तो अनार्य असेल, दारिद्री असेल, तरीही त्याच्याशीं द्वैतभाव ठेवून राहतां कामा नये, प्रेमानेंच राहिलें पाहिजे. तशांत जो माझा भर्ता गुणांनीं श्लाघ्य, दयाळू, जितेंद्रिय, स्थिरप्रेमा, धर्मात्मा, आई—बापांप्रमाणें प्रिय करणारा, सर्व इतर स्त्रियांना कौसल्येप्रमाणें मानणारा, व दशरथांच्या कोणत्याही स्त्रिया

असोत त्यांना आईप्रमाणें मान देणारा, त्यावर मीं असें प्रेम ठेविलें पाहिजे, हें सांगावयाला कां पाहिजे?—हाच उपदेश सासूबाईंनी वनास निघण्याचे वेळीं मला केला, विवाहाच्या वेळीं अग्निसमक्ष आईनें असाच बोध केला, तो मी लक्षांत ठेविला आहे. मी विसरलें नाहीं कीं पतिसेवे वांचून नारीला दुसरें तप सांगितलें नाहीं "-(२,११८,२-८). या उताऱ्यांत रामाचे एकपत्नीव्रताचा व दशरथाच्या बहुपत्नी-कत्वाचा ही उल्लेख मोठ्या खुबीनें केला आहे. रामायणकालीं एकपत्नीत्वाचा परिपाठ कमी होता, व तो कवीनें लोकांच्यापुढें इतका मोहक करून ठेविला आहे, याबद्दल सर्व पुढील लोक कवीचे ऋणी आहेत. दशरथाला तीन मुख्य राण्या असून उपदारा ३५० होत्या असें ह्मटलें आहे. रावणाच्या स्त्रिया किती यांची सख्या नाहीं. वालिसुग्रीव यांचीही तीच कथा. कितीएक ऋषींच्याही दोन दोन बायका होत्या. मात्र रामबंधू आणि बिभीषण यांना एक एकच बायको होती. बहुपत्नीकत्वानें, दशरथाचें प्रेम साध्वी पण वृद्ध झालेल्या कौस-ल्येवरचें उडून मानिनी व तरुण कैकेयीवर कसें बसलें, व याचा रामविवासन व दशरथप्राणत्याग, या रूपानें कसा घोर परिणाम झाला, हें विश्रुतच आहे. कौसल्या राजमहिषी असून तिची जाचणूक फार होत असे—ती रामाला ह्मणते "रामा! तूं झाला नसतास, तर मला किती तरी दुःख झालें असतें. स्त्रियेला मी निपुत्रिक आहे या सारखें दुसरें दुःख नाहीं. पतीपासून जें सुख मिळालें नाहीं, तें पुत्रापासून मिळेल, अशी आशा धरून मी राहिलें होतें. धाकट्या सवतीचीं काळजाला घरें पाडणारीं बोलणीं कितीदा तरी मला ऐकून घ्यावीं लागलीं आहेत. तशीं कोणालाही सहन करावीं

लागलीं नसतील. तूं जवळ असतांना ही माझी जर इतकी मानखंडना होत होती तर तूं प्रवासास गेल्यावर माझें काय बरें होईल? मरणा वांचून दुसरी गति दिसत नाहीं. पतीची मजवर मर्जी नसल्या कारणानें मी त्यांची अक्षयींची नावडती झालें आहें. म्हणून कैकयीच्या दासींच्या बरोबरीची, नव्हे, त्यांच्याहून ही कमी अशी झालें आहें. कोणी चाकर माझी सेवा करूं लागला असतां कैकेयीचा पुत्र दृष्टीस पडला तर मजशीं त्याला बोलण्याचीही भीति वाटते. कैकेयी अक्षयीं रागवलेली, तिचें मुख अक्षयीं पाहून कसें राहवेल?" या उताऱ्यांत नावडत्या वडील सवतीची दुर्दशा फार चांगली वर्णिली आहे. दशरथ ही कैकेयीकृत्येनें मागितलेले दोन वर ऐकून संतप्त होतो, व पश्चात्ताप पावून म्हणतो "जेव्हां जेव्हां कौसल्या प्रसंगानुसारें दासीप्रमाणें, सखी प्रमाणें, भार्येप्रमाणें, भगिनीप्रमाणें व मातेप्रमाणें माझी सेवा करीत असे, माझें मन राखावें म्हणून जपत असे, व गोड बोलत असे, तेव्हां तेव्हां तिचा मीं मान ठेवावा तो ठेविला नाहीं!"(२,१२,-६८,६९). या उताऱ्यांत सखी प्रमाणें असे शब्द आहेत, याचा अर्थ केवळ मैत्रीण असें दिसत नाहीं. तर कार्यांत मंत्री असाही अर्थ घेतां येईल असें वाटतें. निदान वाल्मीकीच्या मताप्रमाणें भार्येनें प्रसंगोपात्त भर्त्याला कार्यांत मंत्र देऊन साहाय्य करावें, भर्त्याचे मताविरुद्ध उचित दिसल्यास बोलावें, असें दिसतें. सीता पतीला दैवत मानीत होती, तरी प्रसंगीं "अधिक्षेप" करण्याला ती मागें पुढें पाहत नव्हती, याबद्दल वर उतारा दिलाच आहे. तसेंच अरण्यकांडांत (सर्ग ९) सीतेनें रामास खड्ग धारण करूं नये, ह्मणून जें भाषण केलें आहे त्यांत प्रथमतः मिथ्या भाषण आणि परदाराभिमर्षण

या दोन दोषांपासून रामाचें वर्तन दूर असून ही खड्गसंयोगानें क्रूरत्वाच्या दोषास पात्र होईल, अशा भीतीनें, एकमहान् ऋषि इंद्रानें सांगितल्यावरून खड्ग जवळ ठेविल्यानें क्रूरबुद्धि होऊन नरकास गेला, अशी गोष्ट सांगून सीतनें रामाला खड्ग टाकून देण्याला उपदेश केला, तो फार चतुर आहे. त्या पूर्वी हें वाक्य आहे.

**स्नेहाच्च बहुमानाच्च स्मारये त्वां तु शिक्षये ॥ २४ ॥**

हा पाठ हल्लींच्या प्रतींत आहे व तो कनकास व तिलककार रामास मान्य आहे. परंतु तीर्थाचा पाठ " न तु शिक्षये " असा आहे तोच बरा दिसतो. " मी स्नेहानें व बहुमानानें आपणाला पूर्वी जो धर्म अवगतच आहे त्याची आठवण देतें; **मी आपणाला शिकवीत नाहीं.** " असें ह्मणण्यांत फार स्वारस्य आहे. भर्त्याला बेळेवर उपदेश करण्यांत सीतेपेक्षांही तारा शहाणी होती असें दिसतें. तिच्याविषयीं वालीचा फार आदर असे. तो म्हणतो " ही सुषेणाची ( वैद्याची ) मुलगी आहे. सूक्ष्मार्थाचा निश्चय करण्यांत, आणि लौकिक अथवा दैविक आपत्तिप्रसंग आल्यास त्यांतून कसें पार पडावें याबद्दल हितवाद करण्यांत ही फार चतुर आहे. जें ही चांगलें म्हणून सांगते, तें कांहीं संशय मनांत न आणतां करावें. तारेनें म्हटलेलें कधींहीं खोटें व्हावयाचें नाहीं –". तारेनें उपदेश केला होता कीं तूं सुग्रीवाशीं वैर करूं नको, तो न ऐकण्याचें मृत्युरूपी फळ वालीच्या डोळ्यापुढें उभें होतेंच. वालीच्या मरणानंतर कपिसेनेचें म्हणणें कीं अंगदास राजा-कर हें नाकारण्यांत, तसेंच सुग्रीव विलासांत दंग झाला असतां रागावलेल्या रामानें लक्ष्मणास पाठविलें असतां, त्याचा कोप शमविण्याकरितां सुग्रीवानें तारेस पुढें करण्यांत, व तिनें लक्ष्मणाची सौम्य शब्दांनीं समजावणी केली यांत,

तिचें शहाणपण दिसून येतें. अनसूयेविषयींही अत्रीचा बहुमान होता. मंदोदरीही रावणास अधर्मापासून परावृत्त करण्यांत झटत असे. व एके प्रसंगीं सीतेला तो मारण्यास निघाला असतां त्याचें निवारण तिनें केल्याचा रामायणांत उल्लेख आहे.

अशीं हीं पतीला बोध करणाऱ्या पत्नींचीं उदाहरणें रामायणांत आहेत. तरी या स्त्रिया अलौकिक होत्या, असें कवीचें हृद्गत दिसतें. सामान्य स्त्रीजातीविषयीं कवीचे अर्थात् रामायणकालीन लोकांचे विचार फारसे उदार नसत, असें वाटतें. दशरथ कैकेयीचें दुष्ट कृत्य मनांत आणून म्हणतो "कपटी स्वार्थ परायण स्त्रियांना धिक्कार असो"—पण तितक्यांत कौसल्येची वगैरे आठवण होऊन आपली चुकी दुरुस्त करून म्हणतो "सर्व स्त्रियांविषयीं माझें हें म्हणणें नाहीं, तर भरताच्या माते संबंधानें आहे" (२,१२,१००). राम भरताला नीतिप्रश्न विचारतो त्यांत "तूं स्त्रियांना सुरक्षित ठेवितोसना? त्यांवर विश्वास ठेवीत नाहींसना? त्यांना गुप्त सांगत नाहींसना?" (२,१००,४९,) असे प्रश्न आहेत. पण माझ्या मतें हा सर्ग प्रक्षिप्त आहे, तेव्हां हें वाक्य जमेस धरूं नये. अगस्त्य रामाला म्हणतो "सीता तुजबरोबर वनवासांत आली हें तिनें दुष्कर काम केलें. कारण सृष्टीच्या प्रारंभापासून स्त्रियांचा असा स्वभाव आहे कीं चांगल्या स्थितींत स्त्रिया मनाप्रमाणें वागतात, पण विपत्काळीं सोडून जातात. त्यांच्या ठायीं विजांचें ( शतऱ्हदांचें ) चांचल्य, शस्त्रांची तीक्ष्णता, गरुड आणि वायु यांची शीघ्र गति, समयीं समयीं प्राप्त होते. पण ही तुझी भार्या या सर्व दोषांपासून विवर्जित असून प्रशंसनीय व पतिव्रतांना उदाहरण

घेण्याजोगी अरुंधती सारखी आहे!" (३,१३,४-६). रामाला मदत करण्याला लक्ष्मण जात नाहीं म्हणून सीतनें मर्मभेदी भाषण केलें, त्यावर लक्ष्मण म्हणतो "तुला उत्तर माझ्यानें देववत नाहीं. तूं माझें दैवत आहेस. स्त्रिया न बोलावें तें बोलतील, यांत नवल नाहीं. हा स्त्रियांचा स्वभाव लोकांत दिसून येत आहे कीं, त्यांना धर्म नाहीं, त्या चपल, तीक्ष्ण व भेद करणाऱ्या असतात××× तूं स्त्रियांच्या दुष्टस्वभावानें मी रामवचन पाळीत असतां माझ्याविषयीं वाईट शंका घेतेस, तर तुला धिक्कार असो"-( ३,४५,२८-३३ ). स्त्री स्वभावाविषयीं इतकीं वचनें पुरीं आहेत.

पत्नीला पति हें दैवत, तेव्हां तो नष्ट झाला असतां तिची स्थिति रामायणकालींही वाईट होतीच. विधवा हा शब्दच त्याकालींही नांव ठेवण्याजोगा होता. तारा म्हणते "पतिहीन जी नारी असते, तिला पुत्र नसला, व धनधान्याची समृद्धि असली, तरी तिला बुध विधवा म्हणतात"-( ४,२३,१२, १३ ). तसेंच "शूराला शहाण्यानें आपली कन्या देऊं नये. मी शूरभार्या झालें म्हणून आज विधवा झालें. माझा मान संपला, माझी शाश्वतगति नष्ट झाली. मी अगाध विपुल शोक सागरांत बुडालें आहें-" ( ४,२३,८-१० ). या तारेच्या भाषणांतील पहिलीं वाक्यें वीरकालास अनुचित आहेत, तीं दुःखभरांत तोंडांतून निघालीं असतील, असें वाटतें. कदाचित् प्रक्षिप्तही असतील. दशरथ गेला असतां अयोध्येला विधवा म्हटलें आहे. रावणाचा नाश झाल्यावर लंका विधवेप्रमाणें होईल असें भविष्य सीता करिते ( ५,२६,२५-२६ ). रावणानें कपट करून रामाचें मायावी शीर व धनुष्य सीतेपुढें टाकलें तेव्हां राम मेला असें समजून सीता शोक करिते,

त्यांत ती म्हणते "मी अति निकृष्ट स्थितीस ( पश्चिमावस्थेस ) येऊन पोहोंचलें—मी विधवा झालें. भर्त्याचें मरण हें नारीला जितकें वैगुण्य आणितें (तितकें वैगुण्य दुसऱ्या कोणत्याही आपत्तीनें येत नाहीं. ) (८६, ३२, ८–९ ). मंदोदरी रावण-वधा नंतर शोक करिते, त्यांतील वेचे घेतों —"सीतानिमित्तें तूं मरण दुरून ओढविलें. रामासह मैथिली शोकांतून मुक्त होऊन विहार करील. पण माझें पुण्य अल्प ह्मणून मी या घोर शोकसागरांत पडलें. कैलासादि रम्यस्थळीं तुजबरोबर दिव्य-श्रीनें विहार करीत होतें, त्या विहारांस व कामभोगांस मी आतां अंतरलें. पूर्वी मी कशी होतें आतां कशी झालें....वैध-व्य देणारी ही कष्टतम (पश्चिमा) दशा मला प्राप्त झाली. इचा मीं मन्देनें पूर्वी कधींही विचार केला नाहीं. माझा पिता दानवांचा राजा, माझा भर्ता राक्षसांचा राजा, माझा पुत्र इंद्राला जिंकणारा असा मी गर्व करीत होतें. जेव्हां लक्ष्मणानें इंद्रजिताला मारिलें तेव्हांच मला तीव्राघात झाला. आतां तर पडलेंच. बंधूवांचून व तुजवांचून मी आतां अनाथ झालें. माझे कामभोग संपले. निरंतर वर्षानुवर्ष मी शोक करीत राहणार"–!(६,१११ ).

विधवांची अशी कष्टतम दशा होती तरी त्यांचें वैरूप्य करीत असत, असें दिसत नाहीं, केशवपनाचा रामायणांत कोठेंही उल्लेख नाहीं. प्रोषितभर्तृकां प्रमाणें विधवा एकवेणीधरा राहत असत व पुण्याचरणांत कालक्षेप करीत. पतिव्रता स्त्रियांचा कोणी छळ केला तर त्या शाप देतात, व त्याचा परिणाम घोर होऊन छळ करणाऱ्यांच्या स्त्रिया विधवा होतात, कारण पतिव्रतांचीं आसवें भूतलावर उगींच पडाव-याचीं नाहींत, असा लोक प्रवाद असे (६,१११,६४ ६७).

विधवा वेणीफणी करीत नसतील, पण विशेषक (कपाळावर कुंकू?) व तिलक (गालावर टिळा) लावीत नसत, असें दिसून येत नाहीं. कारण दशरथमरणानंतर कैकेयीच्या महालांत आल्यावर भरत तिला विचारितो कीं दशरथ कोठें आहे? त्या-वेळीं हल्लीं समजलेलें सौभाग्यचिन्ह तिच्या कपाळावर दिसलें नसतें, तर त्याला प्रश्न करण्याची जरुरीच राहिली नसती. तेव्हां तीं चिन्हें होतीं, असें अनुमान करण्यास जागा आहे. पण कदाचित् शोकान्ध दृष्टीनें या गोष्टीकडे भरताचें लक्ष गेलें नसेल, किंवा कैकेयीनें भरताला राज्यप्राप्ति होईल या हर्षांत हीं सौभाग्य चिन्हें चौदा दिवस तिनें कायमच ठेविलीं असतील, असें रूढि समर्थन करणारे म्हणतील. असो. पतीच्या शवाला अग्नि संस्कार देत त्यावेळीं पत्न्या स्मशानांत जात असत. तसेंच पतिमरणोत्तर एक वर्षांत कोठेंही बाहेर पडूं नसे असा निर्बंध असल्याचें दिसत नाहीं. कारण दशरथाच्या सर्व पत्न्या दिवस केल्यावर रामाला परत आणण्याकरितां भरत निघाला असतां बरोबर गेल्या होत्या. भरद्वाजाच्या आश्रमांत एक रात्र राहून दुसरे दिवशीं त्यांनीं ऋषीला प्रणिपात केला, व भरतानें प्रत्येकीला दाखवून प्रत्येकीचें नांव सांगितलें. विधवा प्रायः सती जात नसत असें दिसतें. सतीचें एकच उदाहरण रामायणांत आहे व तेंही प्राचीन आहे.

राजवाड्यांतील कांहीं भागांत कांहीं अधिकाऱ्यांचा प्रवेश राण्या बसल्या असतांही होत असे. अशा ठिकाणीं सूत, सिद्धार्थ महामात्र इत्यादिकांसारख्या चिरपरिचित अधिकारी राण्यांशीं बोलत; त्यांनीं दशरथा समोर कैकयीची तिच्या दुष्ट कृत्याबद्दल निंदाही केली आहे. स्त्रिया विवाहित व अविवाहित

एकाद्या उपवनामध्यें जात असत. मोठ्या घराण्यांतील स्त्रिया शिबिकांत बसून रस्त्यांनीं जात. अवगुंठन ( बुरखा ) घेण्याची चाल असे, अवगुंठन न घेतलें तर मर्यादेचा अतिक्रम होतो असा समज असे. मंदोदरी रावणाविषयीं शोक करितांना म्हणते " मीं अवगुंठन घेतल्या वांचून नगराच्या द्वाराबाहेर पडून पायींच आलें ह्मणून तर तूं मजवर रागावला नसशील ना ? " रावणवधानंतर सीता शिबिकेंत बसून रामाचें दर्शन घेण्याकरितां आली, तेव्हां बिभीषण वनचरांना एकीकडे करावयाला लागला. तेव्हां राम रागानें म्हणतो " माझा अनादर करून यांना उगीच त्रास कां देतां ? ही गडबड कशाला करितां ?- हा जन माझा स्वजन आहे. स्त्रियांचें आवरण गृहें नाहींत, वस्त्रें नाहींत, किंवा प्राकार नाहीं, तसेंच लोकांना दूर करणें इत्यादि प्रकारही आवरण होत नाहींत. स्त्रीचें वृत्तच तिचें आवरण होय. विपत्तिकाळीं, पीडा झाली असतां, युद्धकाळीं, स्वयंवरांत, यज्ञांत व विवाहांत, स्त्रियांना ( पर पुरुषांनीं ) पाहिलें तर दोष नाहीं. तशांत मी जवळ आहें. म्हणून शिबिकेंतून उतरून सीतेनें पायींच येथें यावें " ( ६,१४,२६ ३० ). स्वयंवर आणि विवाह यांचा निरनिराळा निर्देश आहे, हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. पडद्याच्या चालीचा या उताऱ्यांत उगम दिसून येत आहे.

विवाहित स्त्रियांना संध्यावंदन, तपश्चरण वगैरे करण्याचा अधिकार असे. स्त्रिया आमरणांत अविवाहित राहिल्याचें उदाहरण रामायणांत आहे.

आतां अंत्यविधि संस्कारासंबंधानें काय माहिती मिळते तीं पाहूं. अनार्य राक्षसांना मेल्यावर पुरीत असत ( ३,४,२२,

३२ ); परंतु ज्यांना आर्यांच्या गटांत घेतलें असे, त्यांनीं मरणोत्तर अग्निसंस्कारच देत. जटायु, वालि, रावण इत्यादिकांना अग्निसंस्कारच दिला आहे. आर्यांची गर्तेमध्यें पुरण्याची प्राचीन चाल यावेळीं नाहींशीं झालेली होती. अग्निसंस्कार पुत्र किंवा भ्राता हल्लीं प्रमाणेंच करीत असे. यांपैकीं कोणी जवळ नसला तर तो येईपर्यंत प्रेत तैलद्रोणींत ठेवीत असत. दशरथाचें प्रेत चौदा दिवस असें ठेविलें होतें. तों पर्यंत समिद्ध अग्नि राजवाड्या बाहेर ठेविले होते. राजाचें प्रेत शिबिकेंत घालून नेत. त्यांपुढें हिरण्य आणि सुवर्ण ( दोन निराळे शब्द आहेत ) आणि वस्त्रें उधळीत असत. चिता चंदन, देवदार वगैरे काष्ठांनीं रचीत, तीवर नानाप्रकारचे गंध टाकीत, मग अग्निसंस्कार मंत्रांनीं करीत, व सामगीतें गात. अग्निसंस्कारापासून अक्रावे दिवशीं अशौच फिटत असे. युद्धांत चौथे दिवशीं फिटत असे असें दिसतें. बारावे दिवशीं श्राद्ध वगैरे करून दानें देत. अस्थिसंचय करून व राख सावडून स्थळ हल्लीं तिसरे दिवशीं शुद्ध करितात, तें भरतानें तेराव्या दिवशीं केलें. पित्याची उत्तरक्रिया आपल्या हातून झाली नाहीं म्हणून रामाला फार शोक झाला. पण त्यानें क्रिया केली, ती कांहीं फार नव्हती. प्रथम दक्षिणाभिमुख होऊन उदकदान केलें व पिंड दिला. हा पिंड 'यदन्नः पुरुषो भवति तदन्नास्तस्य देवताः, ॥ (२,१०२,३०, [जें अन्न मनुष्य खात असेल तेंच अन्न त्यानें पितृ देवतांना द्यावें] या विधीस अनुसरून इंगुदि ( हिंगणबेट ) फळाच्या पिठाचा केला होता. दक्षिणाग्रदर्भावर ठेविलेला हा पिंड पाहून कौसल्येस फार वाईट वाटलें. ज्या दशरथराजानें इतके भोग भोगिले, त्याला हिंगणबेटाच्या पिठाचा पिंड मिळावा याबद्दल तिला फार दुःख झालें. दुसरें

दिवशीं सर्व भ्राते हुत आणि जप्य करून" रामाजवळ आले.

या वर्णनांत क्षौरविधि नाहीं, तेव्हां क्षत्रियांस तो विहित नव्हता असें दिसतें. ज्या दिवशीं रामाला दशरथाच्या मरणाची वार्ता कळते, त्याच दिवशीं तो पिंड देतो व सर्व विधि संपतो. अशौचाचें अवडंबर फारसें दिसत नाहीं. दुसरे दिवशीं सर्व भ्राते, [भ्रातरः–(बहुवचन) असें म्हटल्यानें लक्ष्मण त्यांत येतो ] हे हुतजप्य करितात. यावरून लक्ष्मणाला दुसरेच दिवशीं हवनजपादि धर्मकृत्यें करण्याचा अधिकार आला असें होतें.

वालीच्या शवाचा अग्निसंस्कार दशरथाच्या प्रमाणेंच प्रायः आहे. त्यांत येवढेंच जास्त आहे कीं रामही सशोक होऊन सुग्रीवा बरोबर वालीचें प्रेतकार्य करितो (४,२९,९३). 'मरणान्तानि वैराणि' (शत्रु मेला, द्वेष निमाला), याचें हें उदाहरण चांगलें आहे.

रावणाचा अंत्यविधि दशरथाच्या अंत्यविधीहून जास्त भपक्याचा होता. अग्निहोत्र व अग्निहोत्राच्या गाड्या श्मशानांत आणिल्या होत्या, शिबिका सुवर्णाची होती. तुर्यघोष होत होते. चित्रविचित्र पताका तिला लाविल्या होत्या. चिता चंदनादिकांनीं रचून तिजवर कृष्णसार मृगाचें आस्तरण घातलें होतें. चितेमध्यें, अग्निहोत्राचीं सर्व पात्रें, स्रू, (पळी), शकट (गाडा), उलूखल( उखळ ), अरणि, उत्तरारणि (अग्नि उत्पन्न करण्याचीं काष्टें,)इतर दारुपात्रें, व मुसळ,हीं चितेमध्यें विहितस्थळीं टाकलीं होतीं. टीकाकार म्हणतो—आपस्तंब सूत्राप्रमाणें हीं सर्व टाकलीं होतीं असें जरी दिसत नाहीं, तरी सूत्रान्तराचा याला अधिकार असेल असें अनुमान करावें. मग मेध्यपशु मारून

परिस्तरणिकेवर तूप टाकिलें. मग वस्त्रें टाकलीं व लाह्या टाकल्या. मग विभीषणानें अग्नि देऊन स्नान केलें व ओल- त्यानें तिलोदक दिलें व मग रावणस्त्रियांस समजावून नगरांत परत पाठविलें. या वर्णनांत रावणाच्या अग्निहोत्राविषयीं इतर अंत्यविधींच्यापेक्षां जास्त लिहिलें आहे. या वेळीं ही रामाच्या तोंडीं " मरणान्तानि वैराणि " असें वाक्य घातलें आहे, व " हा ( रावण ) तुझा तसाच माझा ( बंधु ) " असें विभीषणास रामानें ह्मटलें, यावरून या प्रसंगींही रामानें रावणास उदकांजलि दिला असावा असें अनुमान होतें.

## नरक व स्वर्ग.

मरणाच्या नंतर पापपुण्याच्या मानानें नरकप्राप्ति अथवा स्वर्गप्राप्ति होत असे, असा समज रामायणकालीं ही होता. मरणोत्तर कांहीं नाहीं असें ह्मणणारे नास्तिक असत याचें उत्तम उदाहरण जाबालीचें रामायणांत आहे. तो ह्मणतो " कोण कोणाचा बंधू ? एकटाच प्राणी जन्मास येतो, एकटाच मुरून जातो. ही माझी माता, हा माझा पिता, अशा समजूतीनें जो मनुष्य या संसारांत आसक्त होतो, तो उन्मत्त समजावा. येथें कोणी कोणाचा नाहीं. गांवाला जाणारा मनुष्य एखाद्या घरीं मुक्काम करितो, व दुसरे दिवशीं तें घर सोडून जातो, त्याप्रमाणें, मनुष्यांचे, पिता, माता, गृह, धन इत्यादि मुक्काम होत. यांचे ठिकाणीं सज्जन आसक्त होत नाहींत. रामा ! पित्र्य राज्य सोडून वनांत राहणें तुला उचित नाहीं. समृद्ध अयोध्येंत येऊन अभिषेक करून घे. ती एकवेणीधरा नगरी तुझी वाट पाहत आहे. श्राद्धादि कर्में केवळ अन्नाचा काळ होत. मेलेला मनुष्य कसें खाईल ? एकानें खाल्लेलें दुसऱ्यास पोंहोंचतें असें असेल, तर प्रवासास निघालेल्या मनुष्याकरितांही श्राद्ध केलें तर चालेल;

मग त्याबरोबर पाथेय देण्याची जरुरी नाहीं. ' सारांश पूजाकर, दान कर, दीक्षा घे, तप कर, संन्यास घे, इत्यादि सांगणारे ग्रंथ लोकांना फसवून दानें उपटण्याकरितां तीव्रबुद्धीच्या माणसांनीं केले असावे–" (२,१०८). यावर रामानें उत्तर दिलें आहे, त्यांत चारित्राची महती गाऊन मीं जर वेदप्रतिपादित धर्म सोडला तर लोकही तसेंच करितील. मला सत्यानें वागलें पाहिजे–कारण सत्याच्या पायावर वेद रचले आहेत–पित्याला प्रतिज्ञा करून निघालों ती शेवटास नेलीच पाहिजे–असत्य मार्गानें जाणाऱ्याचें देवादिक हव्य-कव्य घेत नाहींत–पितृवचन पाळून मला राहिलें पाहिजे–कपट न करितां, श्रद्धा ठेवून, कार्याकार्याचा विचार करून या कर्मभूमीवर शुभ कृत्यें केलीं पाहिजेत" (२,१०९), असें ह्मटलें आहे. या सर्गांत बराच भाग निदान शेवटला तरी प्रक्षिप्त आहे. पण रामाचें ह्मणणें जाबालीनें स्वीकारिलें आहे किंवा स्वीकारिलें असें दाखविलें आहे. ठिकठिकाणीं राम धर्मानें वागत असतांही त्याला विपत्ति भोगावी लागते ह्मणून लक्ष्मण धर्मच नाहीं, अथवा असेल तर तो पौरुषा-वांचून लंगडा आहे असें प्रतिपादन करितो. बहुतेक ठिकाणीं यावर राम उत्तर देत नाहीं.

ही कर्म भूमि–येथें जें पेरावें त्याचें फळ घ्यावें–पेरलें नाहीं तर फळ नाहीं (७,७८,१९)–ज्या मानानें पेरावें त्या मानानें फळ मिळतें–पुण्यानुरोधानें स्वर्गप्राप्ति होते–पुण्य क्षीण झालें ह्मणजे पतन होतें–नरकांत यम नानातऱ्हांनीं यातना करितो, अर्थात् नरकाच्या कल्पना निरनिराळ्या आहेत–मरणोत्तर मोक्ष न मिळाल्यास पुनर्जन्म आहे, त्यांत मागील जन्मांतील कृत्यांबद्दल सुखदुःखादि अवस्था प्राप्त

 २४६०

होतात, इत्यादि ब्राह्मण धर्मांतील तत्त्वें रामायणकालांतही संमत होतीं. यज्ञयागादि क्रिया प्रचलित होत्या, परंतु त्यांचें प्रस्थ मोडायाला सुरवात झाली होती. यज्ञांत निश्चेष्टित पशूंचा वध करावा लागतो, तो कुत्सित आहे असें लोकमत होऊं लागल्याला सुरवात झाली होती ( ३,७०,१०६ ). हेंच मत प्रबल होऊन बुद्धाचे मतास पुढें बल देणारें झालें.

पातकांनीं नरकप्राप्ति होते असें ह्मटलें आहे. पण, राजानें या जगींच पाप्याला दंड केला तर पुढें दंड नाहीं. असा समज असे. पातकांत कोणते अपराध गणिले असत, यांची यादी करणें कठीण आहे. सामान्यत: हल्लीं जीं पापें समजतात त्यांतील कांहीं व जीं चमत्कारिक वाटलीं तीं पुढें दिलीं आहेत:—

राजा, ब्राह्मण, मित्र गाय, आणि प्राणि यांचा वध करणें ( ४,१७,३६ ),
निजलेल्या गाईला लाथ मारणें ( ३,७५,२४ ),
सूर्यापुढें उभें राहून विधि करणें,
काम करून घेऊन भृत्याला वेतन न देणें,
प्रजापालक अशा राजाचा द्रोह करणें,
षड्भाग घेऊन प्रजापालन न करणें,
दक्षिणा देण्याचें कबूल करून ती न देणें,
अधर्म युद्ध करणें,
श्राद्धादि कर्मा व्यतिरिक्त छाग मांस खाणें,
गुरूचा अपमान करणें,
गुह्य फोडणें,
घरांत पुष्कळ माणसें असतां एकट्यानेंच गोड गोड खाणें,
भृत्याचा त्याग करणें,

लाख, दारू, मांस, लोह आणि विष विकून पोट भरणें,
दारू पिणें,
स्त्रीलंपट होणें,
द्यूत खेळणें,
उभय सध्यांचे काळीं निजणें,
घरें जाळणें, विष देणें, पाणी दूषित करणें,
गुरूच्या भार्येशीं रत होणें ( ४,१७,३७ ),
देव, माता, पिता, यांची शुश्रूषा न करणें,
आशा उत्पन्न करून भिकाऱ्यांना धर्म न करणें, तृषार्ताला पाणी न पाजणें,
ऋतुकालीं भार्येशीं गमन न करणें,
सवत्स गाईची अथवा ब्राह्मणाची पूजा कोणी करीत असल्यास तिचा विघात करणें,
अमूक एक दैवत मोठें ह्मणून वाद करीत बसणें किंवा तो ऐकणें,
नास्तिक असणें,
(परिवेत्ता) वडील भावाचें लग्न झालें नसतां आपण लग्न करणें ४,१७,३६
सूचक असणें ह्मणजे चहाडी करणें,
कृपण असणें,
यांतील कांहीं पापें त्या कालच्या परिस्थितीस अनुसरून आहेत, तीं चाणाक्षांना सहज समजण्या जोगीं आहेत.

ब्राह्मणाचा वध करणें हें महा पातकांत गणिलें जात असे. इंद्रानें वृत्राला मारिलें तो वृत्र गाई राखणारा होता—तो पुढें ब्राह्मण झाला—त्याचा वध झाला—तेव्हां इंद्राला ब्रह्महत्या घडली—ती देवांनीं हयमेध करून पर्वतादिकांवर वाटून दिली,

अशी कथा उत्तरकांडांत सांगितली आहे. खुद्द दशरथानें श्रावणास मारिलें. ही कथा दशरथानें कौसल्येस मरणापूर्वी सांगितली. तिची प्रस्तावना या स्थळीं अप्रासंगिक होत नाहीं, म्हणून दिली आहे

जो कोणी शुभ अथवा अशुभ करितो, त्या कर्मांचें तसेंच फळ शुभ अथवा अशुभ, त्याला मिळतें. कर्मांचें गुरुलाघव, फल, गुणदोष जाणीत नाहीं तो मूर्ख समजावा. कोणी मूर्ख आम्रवण तोडून टाकून डाहाळ्यांना पाणी घालीत बसतो–त्यांवर फुलें आहेत म्हणून फळाची आशा करित बसून शेवटीं फसतो. कर्माचें फल काय हें समजून न घेतां, त्याच्या पाठीमागें लागतो, त्याची गत पळसाच्या फुलावर विश्वास ठेवणाऱ्याप्रमाणें होत ( २,६३,६-९ ). हा श्रावण कोण होता ?–

तो तपस्वी, ऋषि, जटा व वल्कलें धारण करणारा, व दंडी होता, असें दशरथानें प्रत्यक्ष पाहिलं होतें. व त्यावरून अनुमान अर्थात झालें असेल कीं, हा द्विजाति असावा. परंतु श्रावण आपण होऊन सांगतो–“हे नृपा ब्रह्महत्या आपल्या हातून घडली असा मनांत ताप करीत असशील तर तो टाकून दे. मी द्विजाति नाहीं. मी वैश्याचा पुत्र शूद्रेच्या ठायीं झालेलों असा आहें.”(२,६३,५०,५१). वाल्मीकीनें या श्रावणास “महर्षि” म्हटलें आहे ( २,६४,१ ). तो वानप्रस्थ, संध्या करीत होता, होम करीत होता, आणि ब्रह्मवादी होता, (२,६४,२३,२४). असें त्याच्या पित्यानें म्हटलें आहे. पण हा वध तूं (दशरथानें) अज्ञानानें केला म्हणून ब्रह्महत्या होत नाहीं असें पुढें म्हटलें आहे. मुनींचा बाप अज्ञानावर जोर ठेवून दशरथाला ब्रह्महत्येच्या दोषांतून मुक्त

करितो. स्वत: मुनि मी द्विजाति नाहीं, तेव्हां ब्रह्महत्या होत नाहीं असें ह्मणून दशरथाचा ताप दूर करितो. या दोन्ही म्हणण्यांत विरोध आहे; व यावरून मुनीचें म्हणणें प्रक्षिप्त असावें, निदान सुधारलेल्या दुसऱ्या आवृत्तींत घातलेलें असावें, असा पाश्चात्य विद्वानांचा तर्क आहे, तो मला खरा वाटतो. माझ्या म्हणण्याला दुसरीं ही प्रमाणें आहेत. १. मुनि मरतेवेळीं आपण होऊन असें बोलेल असें संभवत नाहीं. २. मुनि "ऋषि" "महर्षि" होता, तेव्हां तपश्चर्या केल्यावांचून ही संज्ञा त्याकालीं मिळत नसे असें विश्वामित्राच्या कथेवरून दिसतें (१,६३,२ व १७). ३. रामायणाचा काल लोकपरंपरेनें त्रेतायुगाच्या अंतीं व द्वापाराच्या प्रारभीं होता. पद्यांचा सरळ अर्थ केला तर द्वापारांत होता असें (७,७४ व ७,७६,-३६;७,७७,१,) दिसतें. तप करण्याचा अधिकार त्रेतायुगांत क्षत्रियांना आला (७,७४,१९,) व द्वापारांत वैश्यांना आला (७,७४,२४). संधिकालांत कोणत्या युगाचे धर्म प्रचलित असतात याबद्दल मतभेद आहे. कोणी म्हणतात, मागच्या युगाचे चालतात, कोणी म्हणतात, पुढच्या युगाचे चालतात. पहिल्या पक्षीं श्रावणाचा तात श्रावणाच्या ह्मणण्याप्रमाणें वैश्य होता, तेव्हां त्याला तप करण्याचा अधिकार नव्हता, तेव्हां श्रावणालाही नव्हता; दुसऱ्या पक्षीं श्रावण संकर जातीचा, तेव्हां त्याला तपश्चर्या करण्याचा अधिकार नव्हता. अर्थात् रामायणकालीं "ऋषि" "महर्षि" हीं पदें द्विजातिव्यतिरिक्त पुरुषास मिळण्यासारखीं नव्हतीं. कारण द्विजातिव्यतिरिक्त म्हणजे शूद्र शंबूक तप करूं लागला, त्याबरोबर ब्राह्मणबाल मृत्युरूप घोर अनर्थ घडला; त्याचा प्रतिकार रामास शंबूकवधानेंच करावा

लागला ( ७,७६,४ ) असें उदाहरण आहे. एतावता श्रावण 'ऋषि' 'महर्षि' असला तर द्विजाति असला पाहिजे; व द्विजाति नसला तर 'ऋषि' 'महर्षि' झाला नसता. असा विरोध आहे. म्हणून कोठें तरी वाक्य प्रक्षिप्त असलें पाहिजे. तें कथेचा ओघ पाहिला असतां श्रावणाच्या तोंडचेंच प्रक्षिप्त असलें पाहिजे, असें मला वाटतें.

या कथेचा निष्कर्ष असा निघतो कीं दशरथानें जरी ब्रह्महत्या केली तरी ती अज्ञानानें केली, म्हणून खरी ब्रह्महत्या झाली नाहीं. हा निष्कर्ष गतानुगतिकांच्या दृष्टीस गोड दिसणार नाहीं, पण पारमार्थिकांस बरा वाटेल.

## तप.

कडकडीत तपश्चर्येनें आपणाला जें पाहिजे तें देवापासून मागून घेतां येतें असा रामायणकालीन लोकांचा समज होता: मात्र अमरण मिळत नव्हतें. विश्वामित्रानें, रावणानें, व इंद्रजितानें तप करून देवांस प्रसन्न करून वरदान मिळविल्याच्या कथा आहेत. तप हें कर्म; तेव्हां कर्माचें फळ तदनुरूप देवांना दिलेंच पाहिजे, त्यावांचून गति नाहीं. तप उग्र झालें व वरदान केलें नाहीं, तर दिशा व्याकुल होतात, सर्व तेज मंद होतें, सागर क्षुब्ध होतात, पर्वत ढासळतात, धरणी कांपते, वारा संकुल वाहतो, **लोक नास्तिक होतात,** व एकंदरींत त्रैलोक्याचा नाश होतो असा समज असे ( १,६५,१३–१७ ). कर्माचें फळ मिळालें नाहीं तर लोक नास्तिक होतात व एतद्रूपानें त्रैलोक्याचा नाश होतो हें सिद्धच आहे. भलतेच वर मागितले तरी अमरणावांचून ते देवांना दिलेच पाहिजेत. मग वाटेल तर

देवांनीं कलियुगांतील वकीलांची मार्ग स्वीकारून वरवाक्यां-तील छिद्र काढावें, आणि कुसूम दाखवून फळाच्या वेळीं विसंवाद करावा; हें ही न घडेल तर सरस्वतीची आराधना करून वर मागणाऱ्याच्या जिव्हाग्रीं बसवून तिजकडून अनपेक्षित वर मागवावा. (पहा कुंभकर्णाची कथा). न मागतां अमरणाचें वरदान विभीषणास ब्रह्मदेवानें दिलें, याचें कारण त्यानें कामनारूप वर मागितला नाहीं; वर असा मागितला कीं "परमापत्तींतही असतां धर्माच्या ठायीं माझी मति राहो. मला ब्रह्मविद्या कोणी न शिकवितां येवो"—(७,१०,३०-३१). हेंच खरोखर ईश्वरप्रार्थ-नेचें रहस्य. धर्माभिरक्तांना कोणतेंही दुर्लभ नाहीं (७,१०,३३.) हे त्या काळचे विचार आतांही आपणांस उदात्तच वाटतील.

## सामान्य समजुती.

रामायणकालीं सर्वांचा ज्योतिषावर, स्वप्नांवर, उत्पातांवर शकुनांवर, निमित्तांवर, लक्षणांवर, व दिव्यावर, भरंवसा असे

प्रयाणकालीं अमूक मुहूर्त असावा, लग्नकालीं अमूक नक्षत्र असलें पाहिज, अमूक ग्रह शुभ, अमूक अशुभ, इत्यादि गोष्टी ठरल्या होत्या.

कांहीं स्वप्नें शुभ असत कांहीं अशुभ असत.

दशरथ मरण्यापूर्वी भरताला दुष्ट स्वप्नें पडलीं त्यांचें वर्णन तो असें करितो—स्वप्नामध्यें मीं पिता मलिन व केस मोकळे असा पाहिला. तो पर्वतशिखरावरून गोमयाच्या खा-ड्यांत पडत होता, पुढें तो त्या शेणावर पोहत आहे, तेल ओंजळीनें पीत आहे, व वारंवार हसत आहे, वरचेवर डोकें खालीं घालीत आहे, तेलानें सर्व आंगभर माखला आहे,

तेलांत डुंबत आहे, असा पाहिला. आणखी असें पाहिलें कीं, सागर शुष्क झाला, चंद्र पृथ्वीवर येऊन पडली, व चोहोंकडे गुडुप अंधकार झाला. राजा बसण्याचा हत्ती ह्यांचा दंत मोडला, भडकलेले अग्नि एकदम विझाले; जमिनींत ठिकठिकाणीं भेगा पडल्या, वृक्ष वाळून गेले, सधूम पर्वत ढासळले. लोखंडाच्या चौरंगावर कृष्णवस्त्र परिधान करून पिता बसला आहे व त्यावर काळ्या सांवळ्या बायका प्रहार करीत आहेत; तांबड्या फुलांच्या माळा घालून व तांबडी उटी लावून महाराज गाढवाच्या रथांतून दक्षिणेकडे गडबडीनें जात आहेत. तांबड्या लुगड्याची राक्षसी तोंड वेडेवाकडें करून व हसून त्यांना ओढीत आहे, असें मी पाहिलें. खरयुक्त यानानें जो मनुष्य जातो, त्याची चिता लवकरच पेटायाची आहे, असें समजतात (२,६९,८–१८). त्रिजटेला सीतारामांसंबंधी शुभ स्वप्नें पडलीं व रावणासंबंधी दुष्ट स्वप्नें पडलीं तीं येणेंप्रमाणें:—

जिला एकसहस्र घोडे जुपले आहेत अशा हस्तिदंताच्या दिव्य शिबिकेंत पांढऱ्या फुलांच्या माळा व पांढरें वस्त्र नेसलेला मीं राम पाहिला. त्या बरोबर लक्ष्मण होता. सीता ही शुभ्र पातळ नेसलेली समुद्रामध्यें श्वेत पर्वतावर बसलेली रामाला भेटली. नंतर चतुर्दंत गजावर बसलेले, शुभ्रवस्त्र परिधान केलेले, शुभ्र माल्यांनीं अलंकृत, सूर्याप्रमाणें देदीप्यमान रामलक्ष्मण जानकी जवळ आले. मग त्या पर्वतावर तो आकाशगज उभा राहिल्यावर जानकी गजाच्या स्कंधावर बसली व नंतर भर्त्याच्या अंकावरून उडी मारून तिनें चंद्रसूर्य हातांनीं कवळिले. मग तो गजोत्तम तिघांना घेऊन लंकेला आला एकदां पांढरे वृषभ जोडलेल्या अशा रथांत ( रामलक्ष्मण सीतेसह ) बसलेले मीं पाहिले. एकदा दिव्य पुष्पक विमानांत

बसून उत्तरेकडे जातांना पाहिले. रावण पाहिला तो मुंड, तैलानें माखलेला, तांबडें वस्त्र परिधान केलेला, करवीर पुष्पांच्या माळा ज्याला लावल्या आहेत, अशा पुष्पक विमानांतून धरणीवर पडतांना पाहिला–" ( ५,२७,९-२१, ). पुढील भाग भरतांतील स्वप्नांत सांगितल्या प्रमाणें आहे म्हणून गाळला आहे.

कांचनवृक्ष स्वप्नांत पाहिलें म्हणजे आपलें मरण जवळ आहे, असाही समज होता ( ३,४७,३८ ).

**उत्पादक व शकुन**–प्रबल वारे वाहणें, धरणीकप होणें, पर्वत ढासळणें, वृक्ष उमळून पडणें, मेघांचा गडगडाट होणें, रक्ताचा पाऊस पडणें, संध्या तांबडीलाल दिसणें, ज्वलत् सूर्यापासून अग्निमंडल पडणें ( ६,२४,३६, ); तांबडें खळें पडणें, चंद्रसूर्याला अकालीं ग्रहण दिसणें, उल्कापात होणें, तारे पडणें.

तसेंच, काक, श्येन, गृध्र यांनीं घिरट्या घालणें, कोल्ह्या ओरडणें, इत्यादि उत्पात व शकुन समजत ( ६,३५, २४,३३; ६,१०६,२१–३४ ).

**निमित्तें**–संस्कृत नाटकांत सांगितलीं आहेत तींच प्रायः आहेत. स्त्रियांचा डावा, पुरुषांचा उजवा, डोळा लवणें–शुभ; तसाच हस्त स्फुरणें–शुभ.

याच्या उलट अशुभ निमित्तें समजत.

प्रसन्न मन असणें हें एक शुभ निमित्त गणीत.

**लक्षणें**–हनूमानानें रामाचीं लक्षणें ( ५,३५,१५–२० ) दिलीं आहेत तीं पुरुषाचीं उत्तम अथवा शुभ लक्षणें समजत तीं येणें प्रमाणें–

खांदा–मोठा, बाहू–मोठे, मान–लांब शंखाप्रमाणें, वदन–सौम्य, 'जंत्रु' ( खांद्याचे संधि ) गूढ, डोळे- तांबडे, आवाज-

मेघाप्रमाणें गंभीर, वर्ण-श्याम व स्निग्ध, आंगलट-सारखी; सर्व अवयव सारखे रेखलेले,

तिहींत,-मांड्या, मनगट, आणि मूठ यांत-स्थिर अथवा बळकट;

भृकुटि, बाहू यांत **लांब;**

केशाग्र, गुडघा-**सारखा.**

नाभ्यंत, कुक्षि, वक्ष-**उंच.**

नेत्रांत, नखें, हात-**तांबडा.**

पादरेषा, केश,-स्निग्ध मऊ.

स्वर, गति, नाभि-गंभीर (=खोल, स्वर, व नाभि यासंबंधानें)
( =ऐटदार गति संबंधानें ).

तीन वळ्या असणें, उदरावर, कंठावर, अथवा दोहोंवर;

तीन ठिकाणीं खळगा असणें-पायाचा तळवा, पायांच्या रेखा, व.×

चार ठिकाणीं म्हणजे ग्रीवा,×पाठ, जंघा यांत **आखूड**

डोक्यावर तीन भोंवरे असणें,

आंगठ्याच्या मुळावर चार रेघा असणें; ( चार विद्या दाखवितात. )

ललाटावर चार रेघा असणें; ( या आयुर्दाय दाखवितात. २०० वर्षें ).

शहाण्णव अंगुळें उंची;

चार-बाहु, जानु, ऊरु, आणि गाल-हे सारखे असणें;

चौदा द्वंद्वं सारखीं असणें;-भोंवया, नाकपुड्या, डोळे, कान, ओष्ठ,+,कोपरें, मणगटें, गुडघे+, कटीचे भाग, हात, पाय, नितंब.

दांत–स्निग्ध, जवळजवळ, तीक्ष्ण;

गति–सिंह, शार्दूल, गज आणि वृषभ यांसारखी;

ओष्ठ, हनुवटी, नाक–मोठें, ओठ–तांबडे व मांसल;

हनु–मांसल व उंच, नाक–उंच, लांब, दोन्ही पुड्या सारख्या असें.

पांच ठिकाणीं–वाणी, वक्तृ, नख, केस, त्वचा,–यांत स्निग्ध;

आठ अवयव दीर्घ–दोन बाहु, दोन हातांच्या अंगुळया, दोन ऊरू, दोन टांगा;

दहा ठिकाणीं–मुख, नेत्र, तोंड, जिव्हा, ओष्ठ, तालु,×, नख, पाय, हात, यांवर पद्में अ. कमलें असणें.

दहा अवयव मोठे–ऊर, शिर, ललाट, ग्रीवा, बाहू, खांदा, नाभि, पाय, पाठ, कर्ण–

सहा अवयव उंच–काख, कूस, वक्ष, नाक, स्कंध, ललाट.

नऊ ठिकाणीं सूक्ष्म–अंगुलीचीं पेरें, केश, रोम ( लहान ), नख, त्वचा, श्मश्रु, दृष्टि, बुद्धि.

सीता म्हणते, स्त्रियांचीं उत्तम लक्षणें ( सौभाग्य देणारीं ) माझ्या अंगावर आहेत–तीं:–

पायांवर पद्में. अथवा कमलें असणें; हें साम्राज्याचें चिन्ह आहे ( ६,४८,७–१२ )

केश–सूक्ष्म, सम, आणि निळे;

भ्रुकुटी–एकमेकांना न लागलेल्या;

जंघा–वाटोळ्या व रोगरहित;

दंत–अविरल, मध्यें फट नाहीं असे;

शंख ( नयनोपांतभाग अथवा ललाटभाग ), नेत्र, पाद; घोटे, मांड्या–मोठ्या, व मांसल;

अंगुलि–नखें वाटोळीं अशा, स्निग्ध, व सारख्या

नाभि-खोल व उंच;
पार्श्व आणि ऊरु-मांसल किंवा घट्ट;
कान्ति-उज्ज्वल;
रोम-मऊ;
दोन्ही पाऊलें व त्यांचीं दहा बोटें यांची बैठक चांगली,
हसणें-मंद.

**रक्षा**-एखाद्या वृक्षाची मुळी मंत्रून ती बांधण्याची चाल असे. राम वनवासास निघाला तेव्हां कौसल्येनें त्याच्या करितां विशल्यकरणी औषधाची रक्षा मंत्रून तयार केली (२,२५,३८). सीता प्रसूत झाली, तेव्हां दोन्ही मुलांकरितां वाल्मीकीनें भूतघ्नी व रक्षो विनाशिनी अशी "रक्षा" तयार करून त्यांना दिली (७,६६,६). 'भूतघ्नी' म्हटलें यावरून भूतबाधेवर लोकांचा विश्वास होताच.

**दिव्य** सीतेनें मीं शुद्ध आहें हें दाखविण्याकरितां दोनदा दिव्यें केलीं. पहिल्यानें रावण वधानंतर कपीं समक्ष प्रज्वलित अग्नींत शपथ घेऊन उडी टाकिली (६,११६,२५;२६,२८), व तिला मांडीवर घेऊन रामाला अग्नीनें समर्पण केलें (६,११८,४). या दिव्यानें रामाची खातरी झाली नाहीं म्हणा, किंवा हें दिव्य अयोध्येंतील लोकांनीं पाहिलें नाहीं म्हणून त्यांचा सीतेविषयीं संशय गेला नाहीं, ही कुजबूज ऐकून लोकापवादभीरुत्वानें म्हणा, रामानें पुनः सीतेचा त्याग केला. वाल्मीकीच्या आश्रमांत प्रसूत होऊन तिचे मुलगे बारा वर्षांचे झाले; तेव्हां मुलांची ओळख पटल्यावर वाल्मीकीनें सीतेच्या शुद्ध वर्तनाबद्दल खातरी केली. तरी लोकप्रत्ययार्थ तूं दिव्य करिशील काय, असें रामानें सीतेस वाल्मीकाकरवीं पुसलें. तसें करण्यास ती तयार

झाली. या प्रसंगीं सीतेनें तीन वेळ शपथ घेऊन पृथ्वीला आपल्या पोटांत घेण्यास प्रार्थिलें. तेव्हां पृथ्वीतल दुभंगून त्यांतून दिव्य आसन वर आलें, त्यावर पृथ्वी देवीनें सीतेला आलिंगन देऊन बसविलें, व ती सीतेला घेऊन आसनासह गुप्त झाली. पूर्वी अग्नीनें सीता परत आणून दिली तशी पृथ्वीनें आतां आणून दिली नाहीं. सीता शुद्ध ठरली पण रामाला या लोकीं अंतरली. ( ७,९७,२०, )

## व्यसनें.

रामायण कालांत दोन व्यसनें बरींच प्रचारांत होतीं असें दिसतें. एक दारूचें व्यसन व दुसरें द्यूत—या दोन्ही व्यसनांची निंदा केली आहे, तरी तीं निर्मूळ झालीं नव्हतीं. सुरेचे दृष्टांत कौसल्येच्या, (२,६१,१८) कैकयीच्या, (२,३६,१२) तोंडांत आहेत. दशरथही सुरापी ब्राह्मणाचा दृष्टांत देतो (२,१२,७८) यांत ब्राह्मणाची निंदा केली आहे हें खरें. पण दृष्टांत असंभवनीयच होता, असें म्हणणें कठीण आहे. भारद्वाजानें भरतसेनेचें आतिथ्य केलें त्यांत मैरेय आणि नाना जातींच्या सुरा, यांची रेलचेल करून दिली ती इतकी कीं सैनिक म्हणूं लागले "आम्ही अयोध्येस परत जाणार नाहीं! दंडकारण्यासही जाणार नाहीं. हाच स्वर्ग आहे!" भरत रामाला भेटून अयोध्येस परत आला तेव्हां त्याला अयोध्या कशी दिसली याचें वर्णन करितांना ती, दारू संपली म्हणून फेकून दिलेल्या शरावांनीं गिचमिड जेथें झाली आहे, दारु पिणारे जेथें मेले (पळाले) आहेत, अशा पडलेल्या अव्यस्थित पानभूमी प्रमाणें आहे, असा एक दाखला दिला आहे (२,११,४१४). तेव्हां पानभूमि थोड्या थोडक्या नसतील. पुढेंच भरत म्हणतो "आज अयोध्येच्या रस्त्यांतून वारुणीमधगंध,

पुष्पांचा गंध, व चंदनाचा गंध वाऱ्या बरोबर येत नाहीं."
(२,११४,२०), या तीनहीं गंधांची मैत्री होती हें स्पष्ट
आहे. लक्ष्मणानें किष्किंधेच्याही महा पथांत या तिन्ही गंधां-
चा अनुभव घेतला (४,३३,७). मद्य हें वीरपान असे. तें
पिऊन अंगांत वीर्य चढतें ( ४,११,३८ ). रावणाच्या पान-
भूमीचें तर वर्णन मारुतीनें उत्तमच केलें आहे ( ५,९ ).
अन्त:पुरांतील सर्व स्त्रिया पान करून निद्रावश होत, सुरा
शर्करेपासून, मधापासून, किंवा द्राक्षांपासून, मोहाच्या फुलां
पासून, खजुरापासून करीत असत (५,११,२३). असा हा
सुरांचा इतिहास प्राचीन आहे.

द्यूताचे उल्लेख दोन तीन आहेत. अक्षांनीं म्हणजे फाशांनीं
द्यूत खेळत. जो हरत असे त्याचे अलंकार, वस्त्रें वगैरे महा
धूर्त लुबाडून घेतात ( ५,१४,१५ ), असें वर्णन आहे.

## मांस.

रामायणकालीं मांसाहार फारसा निषिद्ध होता असें नाहीं.
पंचनख प्राण्याचें मांस वर्ज्य आहे असें वाली म्हणतो.
मांस शिजवून त्यांत मसाला घालीत. असें मांस वान-
प्रस्थाश्रमांत चालत नसे. मृग, मयूर, कुक्कुट, ( ५,११,१५,)
मेष, अज, वराह, ( २,९१,६७ ), सामान्यपक्षी, रोहित,
चक्रतुंड, नलमीन ( ३,७२,१४ ), साळू, मृग, महिष, व
इतर कांहीं पक्षी व मत्स्य ( ५,११,१६–१७ ), यांचें मांस
खाण्याला प्रत्यवाय दिसत नसे. रावणाच्या मुतपाकांतील पशु,
पक्षी, मीन शेवटल्या उताऱ्यांतील आहेत, तेव्हां कदाचित
राक्षसांसच ते भक्ष्य असतील.

ऋषि अभ्यागत आला ह्मणजे त्यास (मधुपर्क) व एक

एक गाय देण्याची वहिवाट आहे. उत्तर रामचरित्रांत बटूनें जो उपहास केला आहे तो अगदीं निराधार नाहीं.

समग्र रामायण वाचून माझा असा ग्रह झाला आहे कीं हा ग्रंथ आपल्या पूर्वजांच्या उदात्त नीतिमत्तेची साक्ष देत आहे. मला वाटतें ज्या देशात सीते सारख्या पवित्र साध्वीचें, रामा, सारख्या पितृभक्त, धर्मनिष्ठ, एकपत्नी, एकवचनी व एक बाणी ( म्ह. दृढनिश्चयी ) वीराचें, लक्ष्मणभरतांसारख्या वडील भावाकरितां सर्व त्याग करण्याला सिद्ध असणाऱ्या धाकट्या भावाचें, मारुती सारख्या स्वामिनिष्ठ सेवकाचें व दूताचें, बिभीषणासारख्या धर्मप्रिय साधूचें, चरित्र लोकांच्या डोळ्या समोर आहे, तोंपर्यंत त्या देशांतील लोक नीतींत इतर राष्ट्रांतील लोकांच्या मागें पडणार नाहींत, पडलेच असतील तर फिरून पुढें येतील. तसेंच विद्या, धन, ऐश्वर्य, बल यांच्या मदानें मनुष्य कितीही अंध झाला, व नीति सोडून तो उत्तथास लागला तर त्याचा कुलासह नाश होतो याचें उत्कृष्ट चित्र वाल्मीकीनें रावणरूपानें आपणांपुढें ठेविलें आहे. या काव्याच्या नीतिमत्तेची येवढी साक्ष बस्स होईल कीं यांत कोणत्याही स्थळीं अश्लील किंवा बीभत्स असे विचार आले नाहींत मारुति रावणाच्या अंत:पुरांत सीतेचा शोध करीत फिरला तेव्हां तेथील स्त्रिया अस्ताव्यस्त निजल्या होत्या. त्यांच्या वर्णनांत कोठेंही भलता शब्द पडला नाहीं. परदाराच्या अवरोध गृहांत मी शिरलों तेव्हां हें पातक झालें कीं काय अशी शंका घेऊन मारुति म्हणतो "माझी परदारांवर विषयवर्तिनी दृष्टि नाहीं. रावणाच्या स्त्रिया त्या निःशंक निजल्या असतां मीं पाहिल्या हें खरें. पण माझ्या मनांत कोणताही विकार उत्पन्न झाला नाहीं. मन हेंच सर्व इंद्रियांना प्र-

र्तक आहे. तें माझें मन सव्यस्थित आहे. शुभाशुभ सर्व अवस्थांत तेंच [साक्षी असतें ]. मनाचा केवढा निग्रह! लक्ष्मण धर्माची निंदा करितो, तो धर्म पौरुषावांचून ( ६,११,३८-४२ ) लंगडा आहे, असें म्हणतो, त्यावर राम स्वत: उत्तर नाहीं. पण गरुडाचें वचन हें त्यावर उत्तरच आहे.

मकुला राक्षसा:सर्वे संग्रामे कूटयोधिन:
शूराणां शुद्धभावानां भवतामार्जवंबलम्

( ६,५०,५३)

या संसारांत सर्व प्रसंगीं आपणा बरोबर युद्ध करणारे कितीही कपटी असले, तरी आपला शुद्ध भाव असेल, व त्या शुद्ध भावास अनुसरून आपल्या अंगीं शौर्य असेल, तर आपला सरळपणा हेंच आपलें बल! हा विचार किती तरी उद्बोधक आहे!

रामायणांत दुसरा एक मोठा गुण आहे तो हा. त्यांतील सृष्टीचीं वर्णनें सरळ पण मोहक आहेत. राम आणि सीता यांचा तर वनवास अयोध्येपेक्षां ही रमणीय वाटत असे. सृष्टीचें विशाल व भयजनक, तसेंच सुंदर व मोहक, स्वरूप संसारोद्विग्न मानसास विश्रांति देणारें व प्रसन्न करणारें आहे असें वाल्मीकीनें ठिकटिकाणीं दाखविलें आहे. ही सृष्टिदर्शनप्रीति आपणामध्यें आलीकडे कमी झाली आहे. तिचा पुनरुद्बोध केवळ सृष्टिदर्शनानें होत नाहीं. तर त्याबरोबर रसिक कवीचे ग्रंथ वाचल्यानें होतो असा माझा समज आहे. बाह्य सृष्टीचें चित्र यथातथ्य घेणारा मनाचा अन्त:पट नसला तर कितीही दर्शनें घेतलें व कैक वेळां घेतलें तरी पटावर चित्र उमटावयाचें नाहीं. हा मनाचा अन्त:पट रामायणासारख्या ग्रंथाच्या परिशीलनानेंच तयार होईल.

रामायण वाचावें याला अडचणी, बऱ्याच आहेत. पहिली अडचण हा ग्रंथ संस्कृतांत आहे. ती मनांत आणून अर्वाचीन कवींनीं (उदाहरणार्थ मराठींत श्रीधरानें व हिंदींत-तुळशी-दासानें) दूर केली आहे. आड खोल होता, दोरी लांब लागत होती ह्मणून त्यांनीं तलाव बांधला. व बाया बाप्यांची, लहान थोरांची, सोय करून दिली. पण मूळांतील असंभावना, अतिशयोक्ति, व अतिविस्तार या गोष्टी आजच्या आगगाडीनें प्रवास करणाऱ्या व तारेनें बोलणाऱ्या लोकांस या प्राकृत ग्रंथांत प्रत्यवाय आहेतच. त्या अडचणी मनांत आणून वाल्मीकीचें काव्य सामान्य जनाला वाचण्यालायक कोणी विद्वान् करील तर त्याचे लोकावर उपकार होतील. अशा तऱ्हेचे प्रयत्न बाबू रमेशचंद्र दत्त इत्यादिकांनीं इंग्लिश भाषेंत केले आहेत. तसे प्राकृतांत (अर्थात् मराठींत ही) व्हावे, अशी माझी इच्छा आहे.

## उपसंहार.

रामायणकाव्य मीं वऱ्हाडांत वाचलें. मला तेथें प्राचीन ग्रंथ किंवा त्यांवरील टीका, तसेच प्राचीन ग्रंथांच्या माहिती संबंधानें झालेले अर्वाचीन ग्रंथ मिळविण्याची सोय नाहीं. प्राचीन ग्रंथांचें अध्ययन करणाऱ्या विद्वज्जनांचाही तेथें समागम नाहीं. तेव्हां काव्य वाचून जी माहिती मिणमिणीत दिव्याच्या साहाय्यानें सापडली ती आपणापुढें सादर केली आहे. ही आपणापुढें कितपत टिकेल हें सांगवत नाहीं. यांतील बराच भाग भ्रममूलक आहे असें सांगणारे येथें थोडे थोडके नाहींत. त्यांनीं निःशंकपणें माझ्या चुका मला दाखवाव्या त्या मी आदरानें पदरांत घेईन. एखाद्या आक्षेपावर मला प्रत्युत्तर करावें असें वाटेल तर तसेंही करीन. काव्याचें अध्ययन करितेवेळीं

…त्र हा खर्डा लिहितेवेळीं पूर्ण होतां होईपर्यंत आपले, बनलेले पूर्ण ग्रह एकीकडे ठेविले होते, समदृष्टी ठेवून साधक बाधक प्रमाणांचा विचार करून यथामति मीं विधानें केलीं आहेत. आतां शुद्ध भावानुरूप वर्तन घडलें कीं नाहीं याचा निर्णय …र्ण आपणावर सोंपवितों.

शेवटीं आपण हा लेख समग्र शांतपणें ऐकून घेतला ह्मणून आपलें, तसेंच आपल्या सभेचे एक चिटणीस व माझे मातुलबंधु चि. रा. रा. दामोदर गणेश पाध्ये एम्. ए. यांनीं मला आग्रह करून हा खर्डा लिहावयाला लाविला ह्मणून त्यांचे, तसेंच माझे मित्र रा. रा. हरीभाऊ दीक्षित यांनीं मला प्रोत्साहन दिलें ह्मणून त्यांचे, आभार मानून आपली रजा घेतों.

REFBK-0002460